cmyk

## संपादकीय

### प्रश्नांची सरबत्ती अन् मंत्र्यांचा गोंधळ !

भारत-पाकिस्तान संघर्षाच्या अनुषंगाने सरकारवर सातत्याने जी प्रश्नांची सरबत्ती सुरू आहे, त्यात आता पुन्हा भरच पडलेली दिसते आहे. आता परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर यांच्या विधानाने सरकार समोरील अडचणी वाढल्या आहेत. एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत एस. जयशंकर यांनी असे म्हटले आहे की 'पाकिस्तानच्या विरोधात आम्ही जी हवाई हल्ल्याची कारवाई केली त्या संदर्भात आम्ही पाकिस्तानला आधीच पूर्वकल्पना दिली होती.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### पुण्यात धुव्वादार; होर्डिंग कोसळले

पुणे : मुंबई, पुणे, कोकणासह मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात वळवाच्या पावसाने दमदार हजेरी लावली असून वादळी वाऱ्यासह वीजांचा कडकडाटही पाहायला मिळत आहे. पुण्यात सलग दुसऱ्या दिवशी दुपारनंतर पावसाला सुरुवात झाली असून मध्यवर्ती भागात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. पुणे-अहिल्यानगर रस्त्यावर वाघोलीजवळ सणसवाडी येथे ही हार्डिंग कोसळल्याची घटना घडली असून ७-८ दुचाकी या होर्डिंग्जखाली अडकल्याची माहिती आहे. सुदैवाने कुणीही जखमी झालं नसल्याचेही समजते.सकाळपासूनच आज पुण्यात अंशत: ढगाळ वातावरण दिसून आलं, त्यामुळे वरुण राजाची कृपावृष्टी होणार असा अंदाज लावला जात होता. त्यातच, हवामान विभागाने देखील पुण्यात पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यानुसार, पुण्यातील विमानतळ परिसरात मुसळधार पाऊस सुरु झाला.


बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-२७ | बुधवार, दि.२१ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


# कमी दरात विक्री केलेल्या कांद्याला भावांतर योजना लागू करा



## शेतकरी संघटनेची मागणी, दर अजूनही पडलेलेच

नाशिक | प्रतिनिधी

राज्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीने कोलमडलेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकार तत्काळ मदत करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेने केली आहे. राज्य सरकारने कांद्यासाठी भावांतर योजना राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबतच निवेदनही शेतकरी संघटनेने प्रशासनाकडे दिले आहे. मागण्या मान्य झाल्या नाही तर मंत्र्यांच्या दारात कांदा ओतून आंदोलन केलं जाईल, असा इशाराही शेतकरी संघटनेने दिला आहे.

राज्य सरकारने कांद्यासाठी भावांतर योजना राबवावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. यासाठी शेतकरी संघटनेने सरकारला इशारा देत आंदोलन करण्याचे म्हटले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून शेतकऱ्यांना कांद्याचे मातीमोल भाव मिळत असून, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची कांद्याची रोपे खराब झाली त्यामुळे कांदा लागवड सुमारे एक महिना उशिरा झाली. तसेच मजूर टंचाई, भेसळयुक्त खते, लागवडीचा वाढलेला खर्च, आणि खतांचे वाढते दर या अडचणींना तोंड देत शेतकऱ्यांनी कांदा उत्पादन घेतले. परंतु काढणीच्या वेळेला आलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून नेला. ज्या शेतकऱ्यांनी कांदा साठवला, त्यांनाही कवडीमोल दर मिळत असल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. सरकारने सरासरी ३००० रुपये दर निश्चित करून भावांतर योजना राबवावी, अशी मागणी पुढे आली आहे. याशिवाय अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे लवकरात लवकर पूर्ण करून तत्काळ आर्थिक मदत जाहीर करावी. मागील तीन महिन्यांपासून शेतकऱ्यांकडून स्वस्त दरात कांदा विक्री होत आहे. त्यामुळे सरासरी ३००० रुपये प्रति क्विंटल दर निश्चित करून भावांतर पान २ वर

# अखेर माजी मंत्री छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश

## राज्यपालांकडून मंत्रीपदाची शपथ



मुंबई | प्रतिनिधी

विधानसभा निवडणूकीत महायुतीला मोठा विजय मिळवित पुन्हा एकदा राज्यात सत्तास्थानी विराजमान झाली. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांना यावेळी मंत्रिमंडळाबाहेर ठेवण्यात आले होते. त्यावरून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार आणि छगन भुजबळ यांच्यात राजकिय वादाची परिस्थिती निर्माण झाली. मात्र रात्री उशीरा झालेल्या राजकिय घडामोडीनंतर छगन भुजबळ यांचा पुन्हा एकदा राज्य मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला.

छगन भुजबळ यांच्या मंत्रिमंडळ समावेशाचा निर्णय झाल्यानंतर महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांना राज्याच्या मंत्री पदाची शपथ दिली. या छोट्याशा शपथविधी सोहळ्यासाठी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधान परिषदेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रमुख पान २ वर

# सबळ पुरावा समोर आला तरच हस्तक्षेप!

## वक्फ सुधारणा कायद्यावरील सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाची भुमिका




### संशोधन केलेला कायदा कलम २५ चे उल्लंघन करतो - कपिल सिब्बल

वक्फ दुरुस्ती कायद्याच्या घटनात्मकतेला आव्हान देणाऱ्या याचिकाकर्त्यांच्यावतीने कोर्टात बाजू मांडणाऱ्या कपिल सिब्बल आणि अभिषेक मनू सिंघवी यांनी मात्र केंद्र सरकारने केलेल्या युक्तिवादाला विरोध केला. तसेच महत्त्वपूर्ण कायद्यावर तुकड्यांमध्ये सुनावणी होऊ शकत नाही, असे सांगितले. संशोधन केलेला कायदा हा घटनेच्या कलम २५ चे उल्लंघन करतो, असे कपिल सिब्बल यांनी सांगितले.

नवी दिल्ली | वृतसंस्था

वक्फ सुधारणा कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयामध्ये महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. या सुनावणीवेळी सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्या नेतृत्वाखालील दोन सदस्यीय खंडपीठाने वादी आणि प्रतिवादींचा युक्तिवाद ऐकून घेत संसदेने पारित केलेल्या कायद्याच्या घटनात्मक वैधतेबाबत महत्त्वपूर्ण विधान केलें. संसदेकडून पारित करण्यात आलेल्या कायद्यामध्ये घटनात्मक विचार असतो. तसेच त्यापैकी कुठलाही कायदा घटनात्मक नसल्याबद्दल कुठलाही सबळ पुरावा समोर येत नाही, तोपर्यंत कोर्ट त्यामध्ये हस्तक्षेप करू शकत नाही, असे सरन्यायाधीशांनी सांगितले.

केंद्र सरकारने या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली की, त्यांनी अंतरिम आदेश पारित करण्यासाठी वक्फ संशोधन अधिनियमाच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणी तीन मुद्द्यांपुरतीच मर्यादित करावी. त्यामध्ये कोर्ट, युजर आणि डीडद्वारे घोषित वक्फ मालमत्तांना डि-नोटिफाय करण्याच्या बोर्डाच्या अधिकारांचाही समावेश आहे. केंद्र सरकारच्यावतीने पान २ वर

# ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकरांचे निधन; मुख्यमंत्र्यांनी वाहिली श्रद्धांजली

पुणे | प्रतिनिधी

ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचे मंगळवारी पुण्यातील राहत्या घरी निधन झाले. २०२१ मध्ये नाशिकमध्ये झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. खगोलशास्त्रासारख्या गहन विषयात त्यांनी केलेल्या संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली. केंब्रिज विद्यापीठातून भारतात आल्यानंतर 'आयुका' संस्थेची पुण्यात उभारणी केली.



जयंत नारळीकर यांनी लिहिलेल्या मराठी विज्ञानकथांमुळे लहान मुलांमध्ये विज्ञानाची रुची निर्माण झाली. त्यांच्या सहजसोप्या आणि अभ्यासपूर्ण विज्ञानकथांचे गारुड वाचकांच्या तीन पिढ्यांवर कायम आहे. ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ, साहित्यिक जयंत नारळीकर यांचे वडील 'रँग्लर' विष्णू वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणितज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित शाखेचे प्रमुख होते. त्यांची आई सुमती विष्णू नारळीकर या संस्कृत विदुषी होत्या. जयंत नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणसी तर उच्च शिक्षण ब्रिटनमधील केंब्रिज विद्यापीठात झाले. त्यांनी पीएच.डी.बरोबरच पित्याप्रमाणे 'रँग्लर' ही पदवी मिळवली. खगोलशास्त्रामधील प्रतिष्ठित असलेले टायसन मेडलवर नाव कोरले. त्यांनी मुंबई येथील टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या (टी.आय.एफ.आर.) खगोलशास्त्र विभागात प्रमुख आणि पुणे येथील 'आयुका' संस्थेचे संचालक म्हणून महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र पान २ वर

# इंटेलिजेंस ब्युरो प्रमुख तपन डेका यांना पुन्हा मुदतवाढ

नवी दिल्ली | वृतसंस्था

केंद्र सरकारने इंटेलिजेंस ब्युरोचे संचालक तपन कुमार डेका यांना एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. त्यांचा कार्यकाळ ३० जून रोजी संपणार होता. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेटच्या नियुक्ती समितीने त्यांच्या सेवेच्या विस्ताराला मान्यता दिली आहे. आता डेका ३० जून २०२६ पर्यंत या पदावर राहतील.



डेका यांच्या उत्कृष्ट कार्यशैलीमुळे आणि देशाच्या अंतर्गत सुरक्षेतील योगदानामुळे त्यांना सलग दुसऱ्यांदा एका वर्षाची सेवा मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यांचे नेतृत्व केंद्र सरकारसाठी विश्वासार्ह आणि प्रभावी ठरले आहे. तपन कुमार डेका हे १९८८ च्या बॅचचे हिमाचल प्रदेश कॅडरचे आयपीएस अधिकारी आहेत. जून २०२२ मध्ये त्यांची पहिल्यांदा दोन वर्षांच्या कालावधीसाठी आयबी संचालक पान २ वर

## बीड स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

# ४० लाख ३१ हजार रुपयांचा गुटखा जप्त


बीड | प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंद्याचे सगुळ उच्चाटन करण्यासाठी अवैध धंद्ये करणारांची गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी स्थागुशा पथकांना सूचना दिलेल्या आहेत.त्यानुसार



गेवराई तालुक्यातील पांढरवाडी येथे मिळालेल्या महितीनुसार पोलिसांनी कारवाई केली यांत सुमारे ४० लाख ३१ हजार रूपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. पान २ वर

# खूशखबर; मान्सून ५ दिवसांत केरळमध्ये येणार



पुणे | प्रतिनिधी

मान्सून पुढील ४ ते ५ दिवसांत केळमध्ये दाखल होण्याचा अंदाज आहे. मान्सूनच्या वाटचालीसाठी पोषक हवामान असल्याने मान्सून यंदा लवकरच देशात प्रवेश करेल, असा अंदाज हवामान विभागाने दिला. दुसरीकडे राज्यातील काही भागात पुढील ५ दिवस वादळी पावसाचा शक्यता असून ९ जिल्ह्यांना वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

मान्सूच्या वाटचालीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे पुढील ४ ते ५ दिवसांमध्ये मान्सून केरळमध्ये दाखल होईल असा अंदाज हवामान विभागाने दिला. मॉन्सून या ४ ते ५ दिवसांमध्ये दक्षिण अरबी समुद्राचा आणखी काही भाग, लक्षद्वीपचा काही भाग, केरळ आणि पान २ वर

# भाजप सोडून सर्वांशी युती करणार-प्रकाश आंबेडकर

धाराशीव | प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी आम्ही भाजपा हा पक्ष वगळता कोणाशीही युती करायला तयार आहोत, असे स्पष्ट केले आहे. मंगळवारी त्यांनी धाराशिवमध्ये पक्ष कार्यकर्त्यांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.

सध्या महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची लगबग चालू झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचा आदेश दिल्यानंतर निवडणुकीच्या प्रक्रियेला चांगलाच वेग आला आहे. पर्यायाने राज्यातील राजकीय पक्षदेखील कामाला लागले आहे. असे असतानाच आता प्रकाश आंबकडेर यांनी आपली भुमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या या विधानाला आता महाविकास आघाडी नेमका कसा प्रतिसाद देते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. विशेष म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८३.५० क्विंटल | २,५०० | २,९४५ | २,६९२ |
| ज्वारी/हायब्रिड: १३३.०० क्विंटल | १,८५० | ४,५३१ | २,३६६ |
| मका/लोकल:५४.०० क्विंटल | २,००० | २,१८० | २,११६ |
| तूर : ६.०० क्विंटल | ६,६०० | ६,७३० | ६,६४३ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १३२.५० क्विंटल | १,६०१ | २,६४० | २,४३३ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ११८.५० क्विंटल | ४,१०० | ४,३०० | ४,२२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ५,४०० | ६,००० | ५,५८० |

# न्यायिक अधिकारी होण्यासाठी आता किमान तीन वर्ष वकिली सक्तीची; सुप्रीम कोर्टाचे आदेश



नवी दिल्ली | वृतसंस्था

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बी.आर.गवई, न्या. ए.जी.मसिह व न्या.के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने मंगळवारी अतिशय महत्त्वपूर्ण निर्णय देत न्यायाधीश पदाची परीक्षा देण्यासाठी किमान तीन वर्ष वकिलीचा अनुभव असणे आवश्यक असणार असून, सदर आदेश या अगोदर झालेल्या निवडीला लागू नसेल तथापि, इथून पुढे तो सक्तीचा असणार आहे असे स्पष्ट केले आहे.

### सक्तीच्या अटीत यापुर्वीही बदल

पूर्वी बहुतांश राज्यांमध्ये तीन वर्षाची प्रॅक्टीस सक्तीची अट होती. सन २००२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही अट रद्द केली होती. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात प्रॅक्टीसची अट असावी अशी मागणी झाली होती. २८ जानेवारी २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल दुरुस्त केला. निकाल प्रलंबित ठेवत गुजरात उच्च न्यायालयातील उमेदवार प्रक्रिया स्थगित केली होती.

ऑल इंडिया जजेस असोसिएशन विरुद्ध युनियन ऑफ इंडियाच्या खटल्यात ६३ पानी निकालात न्यायाधीश पदासाठी परीक्षा देणाऱ्या वकिलांना तीन वर्ष वकिलीचा अनुभव असलेबाबतचे किमान १० वर्ष वकिली केलेल्या वकिलाचे प्रमाणपत्र जे तेथील प्रमुख जिल्हा न्यायाधीशांच्या शिफारशीसह असेल, किंवा प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांचे संबंधित वकिलांचे तीन वर्ष वकिलीचा अनुभव असलेबाबत चे शिफारस पत्र लागणार आहे. जर संबंधित वकील उच्च न्यायालय अथवा सर्वोच्च न्यायालयात वकिली करत असेल तर न्यायालयाने नियुक्त केलेल्या अधिकारी यांचे प्रमाणपत्र गरजेचे असणार आहे. जर एखादा वकील क्लार्क म्हणून तीन वर्ष काम करत असेल तर त्याची देखील वकिली पान २ वर

cmyk

अग्रलेख

# प्रश्नांची सरबत्ती अन् मंत्र्यांचा गोंधळ !

भारत-पाकिस्तान संघर्षाच्या अनुषंगाने सरकारवर सातत्याने जी प्रश्नांची सरबत्ती सुरू आहे, त्यात आता पुन्हा भरच पडलेली दिसते आहे. आता परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर यांच्या विधानाने सरकार समोरील अडचणी वाढल्या आहेत. एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत एस. जयशंकर यांनी असे म्हटले आहे की 'पाकिस्तानच्या विरोधात आम्ही जी हवाई हल्ल्याची कारवाई केली त्या संदर्भात आम्ही पाकिस्तानला आधीच पूर्वकल्पना दिली होती, आम्ही केवळ दहशतवादी तळांवर हल्ले करणार आहोत, आमचे हल्ले लष्करी मोहिमेच्या स्वरूपातील नसतील किंवा पाकिस्तानच्या लष्करावरील कारवाईचाही आमचा इरादा नाही असे आम्ही पाकिस्तानला कळवले होते.' भारताचे परराष्ट्र मंत्री असलेले एस जयशंकर यांचे हे विधान अत्यंत गंभीर स्वरूपात घेतले गेले आहे.

भारताकडून होणाऱ्या कारवाईच्या संबंधात दहशतवादाला आश्रय देणाऱ्या पाकिस्तानला पूर्वकल्पना देणे ही देशाशी आणि भारतीय लष्कराशी झालेली गद्दारी आहे, असा आक्षेप काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी घेतला आहे. एस. जयशंकर यांच्या विधानावर सगळ्यात पहिल्यांदा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हा आक्षेप घेतला. त्यावर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून तोडकेमोडके उत्तर देऊन सारवासारव करायचा प्रयत्न झाल्यानंतर हे प्रकरण आणखीनच पेटले आणि त्यातून सरकार पुन्हा घेरले गेले आहे. पाकिस्तान जे आपले शत्रू राष्ट्र आहे, त्या शत्रू राष्ट्राला आपल्या कारवायांचा सुगावा लागू देऊ नये यासाठी भारतीय लष्कराने कमालीची गोपनीयता बाळगली असताना भारताचा परराष्ट्र व्यवहार मंत्रीच पाकिस्तानला फोन करून या कारवाईची पूर्वकल्पना देत असेल, तर मग या गोपनीयतेला काय अर्थ राहतो, असा एक आक्षेप आहे. आणि दुसरा मुद्दा असा आहे, की दहशतवादी ठिकाणांवर कारवाई करणार असे आधीच कळवले गेल्याने संबंधित ठिकाणावरील दहशतवाद्यांना दुसरीकडे पळून जाण्याची संधी भारताने स्वतःहूनच दिली नाही काय, असाही दुसरा आक्षेप उपस्थित केला गेला आहे. ही चूक परराष्ट्र व्यवहार मंत्रालयात पूर्वी राजनैतिक अधिकारी म्हणून काम करणाऱ्या एस. जयशंकर यांनी केली आहे, त्यामुळे त्याचे गांभीर्य आणखीनच वाढते आहे. अर्थात, पाकिस्तानला हवाई हल्ल्याची पूर्वकल्पना देणे हा केवळ एकट्या एस. जयशंकर यांचा निर्णय असू शकत नाही. कारण, सरकारकडूनच त्यांना तशी सूचना किंवा अनुमती मिळालेली असणार. काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांनी सरकारवर या अनुषंगाने अक्षरशः आगपाखड केली. मोदी सरकारने केलेला हा देशद्रोह आहे, आपल्या सैनिकांशी आणि आपल्या राष्ट्राशी केलेली ही गद्दारी आहे, असे शब्दप्रयोग त्यांनी वापरले आहेत. त्यांनी या सगळ्या प्रकरणाची तुलना मोरारजी देसाई पंतप्रधान असतानाच्या काळात झालेल्या एका भयंकर देशविरोधी घटनेशी केली आहे. खेरा यांनी नमूद केले, की मोरारजी देसाई यांनी पाकिस्तानात भारताचे गुप्तचर अधिकारी त्यांच्या आण्विक कार्यक्रमाची हेरगिरी करण्याच्या कामावर कार्यरत आहेत अशी माहिती थेट पाकिस्तान सरकारच्या तत्कालीन प्रमुखाला फोन करून दिली होती. त्यानंतर आपले हे सगळे अधिकारी भीषण आपत्तीत सापडले. अनेक जण कायमचे गायब झाले. तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी केलेला हा देशद्रोह होता, तसाच प्रकार पुन्हा मोदी सरकारकडून झाल्याचे उघड झाले आहे, असे काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांनी म्हटले आहे. अशाच स्वरूपाची टीका आम आदमी पक्षाच्या वतीनेही करण्यात आली आहे. या संघर्षात अमेरिकेच्या अध्यक्षांना मध्यस्थी करायला वाव का दिला आणि आपण जिंकता जिंकता अचानक माघार का घेतली, या प्रश्नांना उत्तरे देताना सरकारची त्रेधा उडत असतानाच, आता ही पुन्हा वेगळीच सरबत्ती सरकारवर सुरू झाली आहे. पाकिस्तानच्या संदर्भात प्रभावी राजनैतिक उपाययोजना करण्यातही सरकार अपयशी ठरल्याची टीका होत आहे. या संघर्षात एकही देश भारताच्या पाठीशी उभा राहिला नाही, हा मुद्दा जनतेपुढे विरोधी पक्षाने प्रभावीपणे नेला. त्यामुळे सरकारची गोची झाली, त्याच्यावर उपाय म्हणून सर्वपक्षीय शिष्टमंडळ विविध देशांमध्ये पाठवून पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय पातळीवर कोंडी करण्याचा एक चांगला प्रयत्न सरकारने हाती घेतला होता, पण त्यातही सरकारच्याच बाजूने राजकारण झाल्याने काँग्रेससारखा प्रमुख राजकीय पक्ष सरकारच्या विरोधात गेला. त्यामुळे या प्रयत्नांनाही खोडा घातला गेल्याचे वातावरण निर्माण झाले आहे. या सगळ्या प्रकरणात संरक्षण मंत्री आणि पंतप्रधान यांनी नेमके आणि थेट स्पष्टीकरण देणे अपेक्षित असताना हे दोघेही गप्प आहेत आणि त्यातूनही अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

## महाराष्ट्र ही देशाची स्टार्टअप राजधानी–मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

गुंतवणूक आणि स्टार्टअप्स संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. राज्य सरकारने स्टार्ट अप इको सिस्टिम उभी करण्यासाठी १२० कोटी रुपयांचा ''फंड ऑफ फंड्स'' तयार केला आहे, ज्याद्वारे स्केलेबल आणि मार्केटेबल स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले.

सीएसआयआर आणि तीन प्रमुख वैज्ञानिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्टार्टअप कॉन्क्लेव २०२५ चे उद्घाटन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते आज गोरेगाव्मुंबई येथील नेस्को सेंटर येथे करण्यात आले. यावेळी केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच पृथ्वी विज्ञान राज्यमंत्री डॉ.जितेंद्र सिंग, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, एनआयओचे संचालक प्रा.सुनील कुमार सिंह एनसीएलचे संचालक डॉ.आशीष लेले, नीरीचे संचालक आणि डॉ.एस. वेंकट मोहन, स्टार्टअप, उद्योजक, विद्यार्थी आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राला ७०१ किमीचा समुद्रकिनारा असून येथे सागरी अर्थव्यवस्थेच्या आणि सागरी शाश्वततेच्या अफाट शक्यता आहेत. या आधारे हजारो स्टार्ट उभे राहून नवीन व्यवसाय संधी निर्माण होऊ शकतात. त्याचबरोबर, किनारपट्टीची स्वच्छता कशी राखता येईल, मरीन इकॉनॉमीमध्ये शाश्वतता कशी आणता येईल, या प्रत्येक गोष्टीसाठी नाविन्यपूर्ण विचार आणि उपायांची गरज असून स्टार्टअपसाठी ही एक मोठी संधी आहे. आज मरीन रोबोटिक्ससारख्या नवकल्पनांवर भर दिला जात आहे, जे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## चोराच्या उलट्या बोंबा बाजार समितीचे प्रशासन आंदोलनकर्त्या समोर झुकले ?

जालना । प्रतिनिधी

**अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीकडून आत्मदहन करते यांना १५ दिवसात निर्णय घेऊन योग्य तो न्याय देण्याचे दिले लेखी आश्वासन यालाच म्हणतात चोराच्या उलट्या बोंबा आत्मदहन आंदोलनाचा ईशारा देणाऱ्या वडीगोद्री येथील महिला शेतकऱ्यांच्या निवेदनावर अंबड कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती, उपसभापती व सर्व संचालक मंडळ यांच्या चर्चेअंती १५ दिवसात निर्णय घेऊन योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न बाजार समितीमार्फत करण्यात येईल, असे लेखी आश्वासन देण्यात आल्याने सोमवारी (ता. १९) आयोजित करण्यात आलेले आत्मदहन आंदोलन संबंधित शेतकऱ्यांकडून स्थगित करण्यात येत आहे.**




वडीगोद्री येथील महिला शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले होते की, अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीने आम्हा शेतकऱ्यांना अंधारात ठेवून परस्पर बाजार समितीच्या भूखंडाचा लिलाव केला आहे. आम्ही बाधित शेतकरी असून आम्ही बाजार समितीसाठी जमिनी देऊन आहोत. मात्र प्रशासनाने आम्हाला अंधारात ठेवून हुकुमशाही मार्गाने गुपचूपपणे भूखंडाचा लिलाव केला आहे. त्यामुळे सदर लिलाव रद्द करावा, अन्यथा १९ मे सोमवार रोजी बाजार समितीमध्ये आत्मदहन आंदोलन करण्यात येईल असा ईशारा देत महिला शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती अंबड मुख्य बाजारपेठ वडीगोद्री यांनी १५ दिवसात आपल्या निवेदनावर योग्य तो सन्मानजनक निर्णय घेऊन आपणास योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत करण्यात येईल लिलाव कायदेशीर असल्याचा बाजार समितीकडून सांगण्यात येतो दुसरीकडे न्याय देण्याचं पत्र देण्यात येतो यालाच म्हणतात चोराच्या उलट्या बोंबा असे आश्वासन कसे दिले याची पण चौकशी होणे गरजेचे आहे. अंबड कृषी बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित शेतकऱ्यांना अंधारात ठेवून अंबड जालना रोडवरील एका हॉटेलात हुकुमशाही रजाकरी पद्धतीने गुपचूप भूखंडाचा लिलाव उरकून घेतला होता. या प्रकाराबाबत ओरड होताच बाजार समितीच्या सभापतींनी एक प्रेस नोट काढून आम्ही घेतलेला लिलाव कसा कायदेशीर होता, हे पटवून देत आपल्या मनमानी कारभारावर पांघरून टाकण्याचा कायद्याच्या चौकटीत प्रयत्न केला. जर बाजार समितीचा लिलाव योग्य आहे तर संबंधित शेतकऱ्यांना १५ दिवसांचे आश्वासन कशाला दिले? त्यांना आमचे लिलावाचे काम कायदेशीर असल्याचे आजच सांगून टाकायचे होते ना? त्यामुळे आज बाजार समितीकडून दिलेले लेखी आश्वासन म्हणजे केवळ शेतकऱ्यांना झुलवत ठेवण्याचाच प्रकार असल्याच्या आश्वासन दिले. त्यानंतर आत्मदहन आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती महिला शेतकरी संजीवनी काळे आंदोलकांनी दिली. यावेळी बाजार समितीच्यावतीने सभापती, सचिव व संचालकांच्या हस्ते शेतकऱ्यांना आश्वासनाचे लेखी पत्र देण्यात आले. दरम्यान, या आत्मदहन आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बाजार समिती परिसरात कोणताही अनुचित घटना घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त करण्यात आला होता.

# दहशतवादाचा बुरखा फाडू: विश्वशांतीसाठी लढू


२१ मे : दहशतवाद विरोधी दिन – संकल्प करू दहशत वादाचा खात्मा करण्याचा जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथील भ्याड हल्ला कोणीही सच्चा भारतीय विसरू शकत नाही . २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रनांनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पीओकेमधील ९ दहशतवादी अड्डे नष्ट केले. माजी पंतप्रधान स्वर्गवासी राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी २१ मे रोजी दहशतवाद विरोधी दिन पाळला जातो . २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूमधील श्रीपेरुंबदूर येथे प्रचार करत असताना एलटीटीईच्या दहशतवाद्यांनी त्यांची हत्या केली . वयाच्या ४० व्या वर्षी शपथ घेतल्यानंतर राजीव गांधी भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान बनले . १९८४ मध्ये इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर त्यांनी देशाचे सहावे पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला . त्यांनी १९८४ ते १९८९ पर्यंत सेवा बजावली.

त्या दिवशी काय झाले : २१ मे १९९१ रोजी राजीव गांधी एका रॅलीत सहभागी होण्यासाठी तामिळनाडूमधील श्रीपेरुंबदूर येथे गेले . त्यांच्यासमोर एक महिला आली जी लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ इलम या दहशतवादी गटाची सदस्य होती . तिच्या कपड्यांखाली स्फोटकं होती आणि ती पंतप्रधानांकडे गेली आणि म्हणाली की तिला त्याच्या पायांना स्पर्श करायचा आहे . तिने पायाला स्पर्श करताच अचानक बॉम्बचा स्फोट झाला , त्यात पंतप्रधान आणि २५ जण जागीच ठार झाले. दहशतवाद विरोधी दिन साजरा करण्यामागील उद्दिष्टे काय आहेत :



शांती आणि मानवतेचा संदेश पसरवण्यासाठी दहशतवादी गटांबद्दल आणि ते दहशतवादी हल्ला करण्याच्या योजनांबद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढवणे . लोकांमध्ये एकतेचे बीज पेरून लोकांमध्ये एकता वाढवणे तसेच , तरुणांना शिक्षण आणि प्रशिक्षण देणे . दहशतवाद , हिंसाचाराचा धोका आणि लोकांवर , समाजावर आणि संपूर्ण देशावर त्याचा धोकादायक परिणाम याबद्दल देशात जागरूकता निर्माण करणे.

दहशतवाद विरोधी दिवसाचे महत्त्व : शांतता आणि सौहार्द वाढवण्यासाठी दहशतवाद विरोधी दिन साजरा केला जातो . दहशतवाद्यांना निष्पाप लोकांचा विध्वंस करण्याची गरज वाटते कारण त्यांचे ब्रेनवॉश केले जाते , ते त्यांच्या धार्मिक हेतूसाठी किंवा त्यांना विवेक भ्रष्ट झाल्यामुळे ते मानतात . त्यांची प्रेरणा काहीही असली तरी त्यांची कामे अनैतिक आहेत हे नाकारता येणार नाही . हा दिवस आपल्याला हजारो सैनिक आणि पोलीस कर्मचार्यांनी आपल्या देशाचे आणि त्यांच्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी दहशतवादाविरुद्ध लढलेल्या बलिदानाचे स्मरण करण्यास मदत करतो. दहशतवाद विरोधी दिनानिमित्त ही शपथ घेतली जाते : ''आम्ही भारतातील लोक , आपल्या देशाच्या अहिंसा आणि सहिष्णुतेच्या परंपरेवर दृढ विश्वास ठेवत , आम्ही सर्व प्रकारच्या दहशतवाद आणि हिंसाचाराला तोंड देत खंबीरपणे उभे राहू , अशी शपथ घेतो . लोकांमध्ये शांतता , सामाजिक एकोपा आणि समजूतदारपणा राखण्याची आणि मानवी जीवनमूल्यांना धोका निर्माण करणाऱ्या विघटनकारी शक्तींविरुद्ध लढण्याची शपथ घेण्यात येते. हा दिवस कसा साजरा केला जातो : माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे दहशतवाद विरोधी दिनाच्या दिवशी निधन झाले , त्यामुळे या दिवशी अनेक ठिकाणी त्यांना श्रद्धांजली वाहण्यात येते . दहशतवाद आणि त्याचे दुष्परिणाम अधोरेखित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात . या दिवशी रॅली काढून लोकांना जागृतीही केली जाते. काही ऐतिहासिक दहशतवादी हल्ले आजवर जगात अनेक दहशतवादी हल्ले झाले आहेत . त्यापैकी काही खालीलप्रमाणे : १ ) अमेरिका, ११ सप्टेंबर २००१ चा हल्ला – ११ सप्टेंबर रोजी झालेल्या हल्ल्यात सर्व दहशतवादी हल्ल्यांच्या मालिकेच्या रूपात अल-कायदाने अमेरिकेवर लक्ष केंद्रित केले होते . मंगळवारी , ११ सप्टेंबर २००१ रोजी झालेल्या हल्ल्यांमध्ये अंदाजे २९९६ लोक ठार , ६००० हून अधिक जखमी आणि १० अब्ज डॉलर्सहून अधिक किंमतीची संपत्ती व पायाभूत सुविधा नष्ट झाल्या . २ )भारतीय संसदेवर हल्ला, १४ डिसेंबर २००१ भारतीय संसदेत १३ डिसेंबर २००१ च्या हिवाळी अधिवेशन सुरू असताना सकाळी अकरा वाजता पांढऱ्या राजदूताच्या कारमधून आलेल्या पाच सशस्त्र हल्लेखोरांनी संसदेवर गोळीबार केला . त्यानंतर झालेल्या प्रतिहल्ल्यात सर्व हल्लेखोर मरण पावले . ३ ) मुंबई दहशतवादी हल्ला , २६-२९ नोव्हेंबर २००८ ठिकाण छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्टेशन , लिओपोल्ड कॅफे , ताजमहाल पॅलेस आणि टॉवर हॉटेल , ओबेरॉय ट्रायडंट हॉटेल , मेट्रो सिनेमा , कामा आणि अल्बस हॉस्पिटल आणि नरिमन हाऊस . मुंबईत लष्कर-ए-तैयबा या अतिरेकी संघटनेशी संबंधित असलेल्या दहा पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हल्ला करत १४४ माणसे ठार मारली . या हल्ल्यात नऊ बंदूकधारी ठार झाले आणि त्यातून एक जणाला पकडण्यात यश आले होते . नोव्हेंबर २०१२ मध्ये अंतिम बंदूकधारक मोहम्मद अजमल कसाब याला फाशी देण्यात आली. म्हणूनच , दहशतवाद विरोधी दिन हा संताप व्यक्त करतो आणि मानवतेशी एकता दर्शवितो . दहशतवाद म्हणजे दहशतवाद्यांच्या भयानक कृत्यांमुळे लोकांमध्ये जीवितहानी आणि मृत्यूची भीती निर्माण करण्याचे कृत्य आहे . यात शंका नाही की हा मानवांच्या हक्कांवर हल्ला आहे . म्हणून , आपण एकत्र येऊन प्रेम , काळजी इत्यादी पसरवून ते संपवले पाहिजे. '' दहशतवाद्यांना कोणताही धर्म नसतो. त्यांना फक्त विनाशाची भाषा समजते '' असे म्हटले जाते ते बरोबर आहे. राष्ट्रीय दहशतवाद विरोधी दिन हा भारतातील एक महत्त्वाचा दिवस आहे , लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सतर्क आणि सावध राहण्याचे आवाहन केले जाते . लोकांना त्यांच्यातील मतभेदांकडे दुर्लक्ष करून आणि सुसंवादीपणे सहअस्तित्वात राहण्यास प्रोत्साहित करून शांतता प्रस्थापित करतो . समाज शांत ठेवणे किती महत्त्वाचे आहे याची जाणीव करून देतो. २१ मे हा अंतरराष्ट्रीय चहा दिवस देखील आहे :- चहा हे केवळ लोकप्रिय पेय नाही तर अनेक समाजातील सामाजिक चालीरीती, समारंभ आणि आदरातिथ्य यामध्येही महत्त्वाची भूमिका बजावते . चहा उद्योग हा जगभरातील लाखो लोकांच्या उपजीविकेचा प्रमुख स्त्रोत आहे , विशेषत: चहा उत्पादक भागात . आंतरराष्ट्रीय चहा दिनाचे चहा क्षेत्राचे आर्थिक मूल्य ओळखणे आणि शाश्वत चहा उत्पादन आणि न्याय्य व्यापार पद्धतींना प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट आहे. पहिला आंतरराष्ट्रीय चहा दिवस २००५ मध्ये भारताची राजधानी नवी दिल्ली येथे साजरा करण्यात आला आणि नंतर इतर चहा उत्पादक देशांमध्ये – श्रीलंका , नेपाळ , व्हिएतनाम , इंडोनेशिया , बांगलादेश , केनिया , मलावी , मलेशिया , युगांडा आणि टांझानिया येथे साजरा करण्यात आला.हिरवा आणि हर्बल चहा हा अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोकेमिकल्सने समृद्ध असतो . एकूण आरोग्यावर आणि आरोग्यावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो.



चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

## पान १ वरून...

### कमी दरात विक्री केलेल्या कांद्याला

योजना लागू करावी. येत्या १ जूनपासून सरकारने ३००० रुपये प्रति क्विंटल दराने कांदा खरेदी सुरू करावी. कांद्याची जास्तीत जास्त निर्यात होण्यासाठी निर्यातदारांना वाहतूक अनुदान द्यावे, अशा मागण्या करण्यात आलेल्या आहेत.

---------------

### सबळ पुरावा समोर आला

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरन्यायाधीश बी.आर. गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर ही विनंती केली. तुषार मेहता यांनी सांगितले की, कोर्टाने तीन मुद्दे अधोरेखिल केले होते. मात्र या मुद्द्यांशिवाय इतर मुद्द्यांवरही सुनावणी व्हावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांकडून करण्यात आली होती. मात्र आम्ही या तीन मुद्द्यांना उत्तर म्हणून आपले शपथपत्र दाखल केले आहे. आमची विनंती आहे की, ही सुनावणी केवळ वरील तीन मुद्द्यांपुरतीच मर्यादित ठेवण्यात यावी, अशी मागणी तुषार मेहता यांनी केली.

-----------

### अखेर माजी मंत्री छगन भुजबळ

उपस्थिती होती. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे -पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, उद्योग ,मराठी भाषा मंत्री उदय सामंत, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध व्यवसाय विकास विभाग मंत्री अतुल सावे, क्रिडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट,मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, राज्यपाल यांचे सचिव प्रशांत नारनवरे,तसेच मंत्री छगन भुजबळ यांचे कुटूंबीय उपस्थित होते.

----------

### ४० लाख ३१ हजार

दि.२० मे २०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि सुशांत सुतळे, पो.उप.नि.सिध्देश्वर मुरकुटे हे वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे गेवराई हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, मौजे पांढरवाडी ता.गेवराई येथे इसम नामे दादासाहेब अंकुश जाधव हा त्याचे घरामध्ये मोठयाप्रमाणात गुटखा, पानमसाला साठवुन ठेवलेला आहे. तेव्हा सदरची माहिती तात्काळ पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांना कळवुन त्यांनी त्वरीत कारवाई करण्याचे आदेश पो.उप.नि.सुशांत सुतळे यांचे पथकांना दिले. त्यानंतर स्था.गु.शा.पथकाने खबरी ठिकाण पांढरवाडी येथील इसम नामे दादासाहेब अंकुश जाधव रा.पांढरवाडी याचे राहते घरी छापा टाकला असता तो मिळुन आला व त्याचे घराचे झडतीमध्ये त्याने स्वतःचे फायद्यासाठी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत स्वादिष्ठ पानमसाला, तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ वर बंदी असतांना देखील विनापरवाना, बेकायदेशीररित्या घरामध्ये व त्याचे मालकीचे बोलेरो पिकअप, स्विप्ट डिझायर वाहनामध्ये गुटखा, पानमसाला, तंबाखु जन्य पदार्थाचा एकुण ४०,३१,६००/- रु चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीने काही गुटखा जन्य पदार्थ कर्नाटक राज्यातुन व काही इंदुर (राज्य मध्यप्रदेश) येथुन आणल्याचे निष्पन्न झालेले असुन त्यात दोन आरोपींचे नावे निष्पन्न करण्यात आलेली आहे. आरोपीस पोलीस स्टेशन येथे हजर करुन त्याचे विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १२३,२२३,२७४,२७५, ३(५) अन्वये पोउपनि सुशांत सुतळे स्थागुशा, बीड यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली आहे.सदरची कामगिरी नवनित कॉवत पोलीस अधीक्षक, बीड,सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पो.नि.उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे,पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, पोह/विष्णु सानप,राजु पठाण, राहुल शिंदे, विकास राठोड, मनोज वाघ,कैलास ठोंबरे, विकास वाघमारे,चालक नितीन वडमारे व चालक सुनिल राठोड यांनी मिळून केलेली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठ्यावर कारवाई झाल्याने अवैध धंदे करणाराचे धाबे दणाणले आहेत.

--------------

### इंटेलिजेंस ब्युरो प्रमुख तपन

म्हणून नियुक्ती करण्यात आली. डेका यांनी त्यांच्या कारकिर्दीचा बहुतांश काळ इंटेलिजेंस ब्युरोमध्ये घालवला आहे. त्यांनी दहशतवाद आणि अतिरेकीवादाशी संबंधित अनेक महत्त्वाचे खटले हाताळले आहेत. विशेषतः जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवाद आणि हत्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये त्यांची भूमिका निर्णायक राहिली आहे. जून २०२४ मध्ये डेका यांना गुप्तचर विभागाच्या विशेष संचालकपदी बढती देण्यात आली. यापूर्वी ते अतिरिक्त संचालक म्हणून काम करत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली, आयबीने अलिकडच्या काळात अनेक जटिल आणि संवेदनशील सुरक्षा आव्हानांना यशस्वीरित्या तोंड दिले आहे. डेका यांच्या मुदतवाढीवरून असे दिसून येते की मोदी सरकार अंतर्गत सुरक्षेबाबत अत्यंत जागरूक आहे आणि अनुभवी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाला प्राधान्य देत आहे.

------------

### ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकरांचे

फडणवीस यांनी आपल्या शोक संदेशात भारतीय खगोलशास्त्राचा अध्वर्यू निमाल्याची भावना व्यक्त केली. नारळीकर यांना श्रद्धांजली वाहताना मुख्यमंत्री म्हणाले, भारतीय खगोलशास्त्राचा भक्कम पाया घालण्यात डॉ. नारळीकर यांनी अमूल्य योगदान दिले. गणितज्ञ वडिलांकडून मिळालेला वारसा घेऊन डॉ. नारळीकर यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर खगोलीय शास्त्रातील संशोधनात मोलाची भर घातली. त्यांच्या संशोधनात्मक कार्याला जगभरातील विद्यापीठांनी, संशोधनात्मक संस्थांनी मान्यता दिली. भारतात परतल्यावर त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने 'इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रोनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स 'आयुका' या संस्थेच्या उभारणीची जबाबदारी सोपवली. तीही त्यांनी समर्थपणे सांभाळली. या संस्थेलाही त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र अशी ख्याती मिळवून दिली. 'बिग-बँग थिअरी' वर काम करत असतानाच, त्यांनी आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संघाच्या कॉस्मोलॉजी कमिशनचे अध्यक्षपदही भूषवले.

-----------

### भाजप सोडून सर्वांशी युती

निवडणुकीसाठी प्रकाश आंबेडकरांच्या वंचित बहुजन आघाडीतर्फे पक्षपातळीवर आढावा घेतला जाणार आहे. हा आढावा झाल्यानंतर या निवडणुकीबाबत काय भूमिका पुढे येते हे लवकरच स्पष्ट होईल, असेही प्रकाश आंबेडकर यांनी बोलताना सांगितले आहे. वंचित बहुजन आघाडी हा राज्यातील एक महत्त्वाचा पक्ष आहे. दलित तसेच इतर बहुजन या पक्षाचे मतदार आहेत. त्यामुळे हा पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उतरणार असून यामुळे महाविकास आघाडी तसेच महायुतीच्या घटकपक्षांच्या रणनीतीत बदल करावे लागतील. त्यामुळे आता प्रकाश आंबेडकर यांच्या भूमिकेनंतर महाविकास आघाडी नेमकी काय भूमिका घेणार? प्रकाश आंबेडकरांना सकारात्मक प्रतिसाद देणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

------------

### खूशखबर; मान्सून ५ दिवसांत

तमिळनाडूचा काही भाग, बंगाल उपसागराचा काही भाग आणि ईशान्यकडील राज्यांचा काही भाग तसेच मालदीव आणि कोमोरिनचा उरलेला भाग मान्सून व्यापेल, असाही अंदाज हवामान विभागाने दिला. मान्सूनने मंगळवार पर्यंत श्रीलंकेचा बहुतांशी भाग व्यापला होता. तसेच दक्षिणअरबी समुद्राच्या आणखी काही भागात चाल केली होती. मालदीव आणि कोमोरिनच्या आणि बंगाल उपसागराच्या काही भागातही मान्सूनने प्रगती केली होती. राज्यात वादळी पावसाला पोषक हवामान आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात पुढील ५ दिवस काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज आहे. तर विदर्भात दोन ते चार दिवस पावसाची शक्यता वर्तविण्यात आली.

------------

### न्यायिक अधिकारी होण्यासाठी आता किमान

झाली असे गृहीत धरून तो ही या न्यायाधीश पदाच्या परीक्षेस पात्र ठरणार आहे. एकाही दिवसाचा देखील वकिलीचा अनुभव नसलेले, नुकतीच वकिलीची पदवी घेतलेले वकील न्यायाधीश पदी निवड झाल्याने गेल्या काही वर्षात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. न्यायाधीश पदासाठी पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवाने आलेले ज्ञान खूप महत्त्वाचे आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. २१ मे २०२५





मुंबई :– वामा... लढाई सन्मानाची दि.२३ मे पासून संपूर्ण राज्यात धूमधडाक्यात प्रदर्शित होत आहे . त्यानिमित्त माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेऊन वामा... लढाई सन्मानाची चित्रपटाचा अभिनेता डॉ.महेशकुमार वनवे आणि त्यांच्या टिमने आशिर्वाद घेतले.

# सातार्‍यात मोबाईल टॉवर कोसळलं, नाशकात झाड उन्मळून पडलं ; पुणे, मुंबईसह राज्यभरात मुसळधार, सोसाट्याचा वारा

**सातारा । प्रतिनिधी**

राज्यभरातील विविध जिल्ह्यात विजांच्या गडगडाटसह मुसळधार पाऊस () कोसळत असून कुठे झाडं पडली आहेत, कुठे वादळी वार्‍याने पत्रे उडाले आहेत. तर, कुठे वीज पडून जनावरे दगावल्याचीही घटना घडलीय. सातार्‍यात अवकाळी पावसाने थैमान घातले असून अचानक आलेल्या वळवीच्या पावसाने नागरिकांची धांदल उडवली. सोसाट्याचा वारा, ढगांच्या गडगडाट आणि विजेचा कडकडाटासह मोठा पाऊस सातार्‍यात () झाला आहे. या आलेल्या वादळी वार्‍याने कास यवतेश्वर रस्त्यावरील मोबाईल टॉवर कोसळल्याची घटना घडली. या टॉवरखाली ४ ते ५ गाड्यांचे मोठे नुकसान झाले असून २ जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मोबाईल टॉवर कोसळल्याने यवतेश्वर कास रस्ता दोन ते तीन किलोमीटरपर्यंत ठप्प झाला असून वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या आहेत. पोलिसांकडून () वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू आहे.

मुंबईतील पश्चिम उपनगरात सायंकाळी ७ वाजल्यापासून जोरदार पावसाला सुरुवात झाला आहे. शहरातील अंधेरी,जोगेश्वरी,गोरेगाव,मालाड, कांदिवली बोरिवली, विलेपार्ले,सांताक्रुझ आणि वांद्रे परिसरामध्ये सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. दिवसभर उकाड्याने हैराण झालेले मुंबईकरांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. तर अंधेरी पूर्वेत मरोळ परिसरामध्ये सखल भागांमध्ये पाणी भरायला सुरुवात झाली आहे. मुंबईसह पुणे, सोलापूर, सातारा,कोल्हापूर जिल्ह्यातही पावसाने



धुव्वाधार आगमन झाले आहे. पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकण, मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात मुसळधावर पाऊस सुरू आहे.

पुणे, रत्नागिरीत पावसाने जनजीवन विस्कळीत

पुण्यातील स्मार्ट सीटी प्रकल्पाचा भाग असलेल्या बाणेर भागात काही वेळ झालेल्या पावसाने मोठ्या प्रमाणात पाणी साचले. बाणेरमधील बीटवाईज चौकात अनेक वाहन पावसाच्या या पाण्यात अडकली होती. रत्नागिरी परिसरात जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, रेल्वे वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. मुंबईकडे जाणार्‍या जनशताब्दी एक्स्प्रेस आणि तेजस एक्स्प्रेस या दोन्ही गाड्या त्यांच्या वेळापत्रकाच्या तुलनेत २ तास उशिराने धावत आहेत.

नाशिकमध्ये झाड उन्मळून पडले

नाशिकमधील झाड पडण्याची मालिका सुरूच असून सायंकाळी सोसाट्याच्या वार्‍यासह आलेल्या पावसाने कॉलेज रोडसह इतर भागत ही वृक्ष उन्मळून पडण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामध्ये, वाहनाचे नुकसान झाले, सुदैवाने जीवित हानी नाही. शहरातील अनेक भागातील विद्युत पुरवठा खंडीत झाला असून गेल्या काही दिवसापासून अवकाळी पावसामुळे विजेचा लपंडाव सुरू आहे. वीज वितरण कंपनी आणि महापालिकाच्या मान्सून पूर्व कामाची या पावसामुळे पोलखोल होतेय.

सोलापुरात पाऊस, बार्शीत शेड कोसळले

सोलापूर जिल्ह्यातही पावसान दमदार हजेरी लावली असून बार्शीत पावसामुळे कॅन्टीनचे छत कोसळल्याची घटना घडली. या घटनेत एक जण जखमी तर पाच व्यक्तींना सुखरूप बाहेर काढण्यात यश आलं आहे. बार्शी तहसील कार्यालयासमोरील कॅन्टीनचा पत्र्याचा छत कोसळल्याने घडली घटना. सुदैवानं या घटनेत कोणतीही जीवितहानी नाही. मात्र, एका जखमी व्यक्तीवर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेची माहिती कळताच आपत्ती व्यवस्थापन टीमने बचावकार्य करून पाच व्यक्तींना सुखरूप काढले बाहेर

# क्षुल्लक मुद्द्याला जास्त महत्त्व देऊ नका : सरन्यायाधीश भूषण गवई

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

**शिष्टाचार उल्लंघनासारख्या क्षुल्लक मुद्द्याला जास्त महत्व देऊ नका, असे आवाहन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी मंगळवारी (दि.२०) केले. सर्वोच्च न्यायालयाने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, सर्व संबंधितांनी या प्रकरणात आधीच दिलगिरी व्यक्त केली आहे. सरन्यायाधीश झाल्यावर पहिल्यांदाच महाराष्ट्र दौर्‍यावर गेल्यावर शिष्टाचाराचे उल्लंघन झाल्याची खंत न्यायमूर्ती भूषण गवईंनी व्यक्त केली होती. त्यानंतर हा मुद्दा देशभरात चर्चेत आला आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही या प्रकरणी टिप्पणी केली.**

भारताचे सरन्यायाधीश यांच्या महाराष्ट्र दौर्‍यादरम्यान शिष्टाचाराच्या मुद्द्यांबाबत माध्यमांमध्ये बातम्या प्रसिद्ध होत आहेत. संबंधित सर्वांनी आधीच दिलगिरी व्यक्त केली आहे. त्यामुळे क्षुल्लक मुद्द्याला जास्त महत्त्व देऊ नये, असे आवाहन सरन्यायाधीशांनी केले असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले.

दरम्यान, मुंबईमध्ये १८ मे रोजी सरन्यायाधीश गवई यांनी सत्कार कार्यक्रमात राज्य सरकारच्या वरिष्ठ



अधिकार्‍यांच्या अनुपस्थितीबद्दल खंत व्यक्त केली होती. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सरन्यायाधीश गवई यांचे समर्थन केले होते. आपण शिष्टाचारावर विश्वास ठेवला पाहिजे. त्याचे पालन करणे मूलभूत आहे, असे ते म्हणाले.

सरन्यायाधीशांच्या महाराष्ट्र प्रवासात कोणते राजशिष्टाचार पाळावेत, यासाठी दिशानिर्देश राज्य सरकारकडून जारी, आज जारी केले परिपत्रक

– भारताचे सरन्यायाधीश आता कायमस्वरुपी राज्य अतिथी म्हणून घोषित – मुख्य सचिव अथवा त्यांचे प्रतिनिधी, पोलिस महासंचालक अथवा त्यांचे प्रतिनिधी हे मुंबईत – राज्यातील अन्य जिल्ह्यात जिल्हाधिकारी किंवा त्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित असतील. – कोणी व्हीव्हीआरपी येत असतील तर त्यांच्या विभागाशी संबंधित संपर्कासाठी समन्वय अधिकारी नेमणे आधीच्या आदेशानुसार बंधनकारक आहे. त्यामुळे सरन्यायाधीशांच्या भेटीवेळी विधी व न्याय विभागाने मुंबईसाठी, तर जिल्ह्यात असेल जिल्हाधिकार्यांनी समन्वयासाठी क्लास १ अधिकारी नेमणे बंधनकारक असेल.



मुंबई :– मा.छगन भुजबळ यांनी मंगळवारी राजभवनात मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सोबत समता परिषदेचे ॲड.सुभाष राऊत

# शिवराज दिवटे मारहाण प्रकरणातील आरोपींना मकोका लावा– फुलचंद कराड

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

सप्ताहातील भांडण सोडवण्याच्या कारणावरुन परळी तालुक्यातील लिंबोटा येथील युवक शिवराज दिवटे यास २० जणांनी मारहाण केल्याच्या घटनेनंतर रविवार दि.१८ रोजी भगवान सेनेचे सरसेनापती, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जेष्ठ नेते फुलचंद कराड यांच्या नेतृत्वाखाली लिंबोटा येथे परळी–बीड महामार्गावर रास्तारोको आंदोलन करण्यात आले.याप्रकरणातील आरोपींना मकोका लावा अशी मागणी करत यासाठी आपण गावकर्‍यांना सोबत घेवुन उपमुख्यमंत्र्यांना निवेदन देणार असल्याचे कराड यांनी सांगितले.




परळी शहरातील जलालपुर येथील सप्ताहात आलेल्या युवकास तु त्या भांडणात होतास या कारणावरुन २० जणांनी त्यास रत्नेश्वर टेकडीवरील झाडीत रिंगण टाकुन बेदम मारहाण करत जखमी केल्याची घटना दि.१६ मे रोजी घडली होती.याप्रकरणी संभाजीनगर पोलिसांनी सात जणांना ताब्यात घेतल्यानंतर पाच जणांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती.यापैकी दोघे अल्पवयीन असल्याने त्यांची रवानगी बालसुधारगृहात करण्यात आली होती. या घटनेतील उर्वरीत आरोपींना अटक करावी त्यांच्यावर मकोका लावावा व अशा घटना वारंवार घडु नयेत पोलिसांनी गुंडांना अटकाव घालावा या मागणीसाठी फुलचंदराव कराड यांच्या नेतृत्वाखाली लिंबोटा ग्रामस्थ रविवारी सकाळी एकत्रित येत चार तास रास्तारोको केला.यामुळे परळी–बीड रस्त्यावरील वाहतूक खोळंबली होती.शिवराज याचे आजोबा लिंबोट्याचे माजी सरपंच होते व ते माझे सहकारी होते.मारहाण झाल्यानंतर शिवराज याची अंबाजोगाई दवाखान्यात भेट घेवुन पोलिस अधीक्षकांकडे आरोपींना अटक करण्याची मागणी केली.रविवारी रास्तारोको सुरु झाल्यानंतर ग्रामीण पोलिस ठाणे, संभाजीनगर पोलिस ठाण्याचे पो.नि.व गिरधावर यांनी निवेदन स्वीकारल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

# देशात कोरोनाने हातपाय पसरले ;महाराष्ट्रासोबत सिंगापूर, हाँगकाँगमध्ये सर्वाधिक रुग्णांची नोंद

**मुंबई । प्रतिनिधी**

**काही वर्षांपूर्वी जगाला धडकी भरवणार्‍या कोरोना व्हायरसने पुन्हा एकदा सगळीकडे आपला विळखा घट्ट करण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही दिवसांत देशात कोविड–१९ म्हणजेच कोरोनाचे अनेक रुग्ण आढळले आहेत. आरोग्य मंत्रालयाने यासंदर्भात एक अपडेट शेअर केले आहे. त्यानुसार देशभरात अलर्ट जारी करण्यात आला आहे.**

सिंगापूर आणि हाँगकाँग इतर देशात कोरोना पुन्हा झपाटयाने वाढत आहे. आता राज्यातही सावधानता बाळगण्याची सूचना जारी झाल्या आहेत. कोरोनामुळे २५७ केसेस महाराष्ट्रात आढळल्या आहेत. मुंबईतही कोरोनाच्या केसेस आढळल्या आहेत. मुंबई महानगरापालिकेच्या आकडेवारीनुसार ५३ कोरोना संक्रमित रुग्ण आढळले आहे. तसेच कोरोनाच्या संक्रमनामुळे दोन जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.



केंद्र सरकारने जारी केलेल्या एका अहवालानुसार, ''१९ मे पर्यंत देशात कोविडचे २५७ सक्रिय रुग्ण आढळले आहेत.'' त्यामुळे देशात अर्लट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, भारतासोबतच इतर देशांमध्येही रुग्णांची संख्या वाढू लागली आहे. आशियामध्ये कोविड १९ च्या रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. यापैकी बहुतेक प्रकरणे १ प्रकाराची आहेत.

भारतात सध्या २५७ सक्रिय रुग्ण आहेत. ज्यामध्ये केरळ, महाराष्ट्र आणि तामिळनाडू आघाडीवर आहे. गेल्या आठवड्यात केरळमध्ये ६९ नवीन रुग्णांची नोंद झाली. महाराष्ट्रात ४४ आणि तामिळनाडूमध्ये ३४ रुग्णांची भर पडली. महाराष्ट्रातही दोन मृत्यूंची नोंद झाली, जे डॉक्टरांच्या मते कोरोनामुळे झालेले मृत्यू नाहीत, परंतु दोन्ही रुग्ण कोविड–१९ पॉझिटिव्ह आढळले.

महाराष्ट्रात कोरोनाचे रुग्ण :

महाराष्ट्रात सध्या ५६ कोरोनाचे रुग्ण आहेत. मुंबईतील केईएम रुग्णालयाने अलीकडेच दोन मृत्यूची नोंद केली असून एक ५९ वर्षीय कर्करोग रुग्ण आणि एक १४ वर्षीय मुलगी किडनीच्या आजाराने ग्रस्त आहे. दोन्ही रुग्णांचा मृत्यू अंतर्निहित आजाराने झाला असला तरी, त्यांची कोरोना चाचणी देखील पॉझिटिव्ह आली आहे. आशियातील अनेक देशांमध्ये कोविडने पुन्हा एकदा थैमान घातले आहे. नेशन थायलंडच्या मते, ३ मे रोजी संपलेल्या आठवड्यात हाँगकाँगमध्ये ३१ प्रकरणे नोंदवली गेली. सिंगापूरमध्ये, २७ एप्रिल ते ३ मे या आठवड्यात कोविड–१९ प्रकरणांची अंदाजे संख्या १४, २०० होती, जी मागील आठवड्याच्या आकडेवारीपेक्षा जास्त होती. गेल्या आठवड्यात ११, १०० प्रकरणे नोंदवण्यात आली.

# राज्यातील एक लाख कोटींच्या गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता, १ लाख रोजगार निर्मिती होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत उद्योग विभागातील धोरण कालावधी संपुष्टात आल्यामुळे प्रलंबित असलेल्या ३२५ प्रस्तावांना आज मंत्रिमंडळाच्या मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या प्रस्तावांना मंजुरी दिल्यामुळे १,००,६५५.९६ कोटी रूपयांची गुंतवणूक आणि ९३,३१७ रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.**

उद्योग विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ आणि त्याअंतर्गत फॅब प्रकल्पाकरिता प्रोत्साहने, महाराष्ट्राचे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण २०१८, रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स ॲण्ड ज्वेलरी, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरिता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले धोरण २०१८, महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण २०१९ या धोरणांचा कालावधी संपुष्टात आलेला आहे. सदर विषयांचे नवीन धोरण ठरविण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. मात्र धोरणाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर प्राप्त झालेल्या विविध घटकांच्या प्रस्तावापैकी राज्याच्या विकासाच्या दृष्टीने फायदेशीर ठरतील अशा घटकांना प्रोत्साहने मंजूर करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. वरील धोरणांचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे नवीन धोरण लागू होईपर्यंत संबंधित धोरणानुसार प्रलंबित प्रस्तावांना मान्यता दिल्यास उद्योग घटकांना गुंतवणूक करणे, उद्योग घटकांना अनुदान देणे शक्य होणार आहे. यानुसार महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ आणि त्याअंतर्गत फॅब प्रकल्पाकरिता प्रोत्साहने धोरणाच्या अधीन राहून ३१३ प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. ३१३ प्रस्तावांमधून ४२,९२५.९६ कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून ४३,२४२ रोजगार निर्मिती होणार आहे.



महाराष्ट्राचे अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण २०१८ नुसार एकूण १० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या १० प्रस्तावांमधून ५६,७३० कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून १५,०७५ रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. तर रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स ॲण्ड ज्वेलरी, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरिता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले धोरण २०१८ अनुसार २ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावांमधून १००० कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून ३५,००० रोजगार निर्मिती अपेक्षित आह १) कारंजा, जिल्हा वाशिम येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्याचा निर्णय. यासाठी एकूण २८ पदनिर्मितीला तसेच १.७६ कोटींच्या खर्चाला मंजुरी (विधी व न्याय विभाग) २) बायोमिथेनेशन तंत्रज्ञानाचा वापर करुन कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी मे. महानगर गॅस लिमिटेड यांना बृहन्मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देणार (नगरविकास विभाग) ३) राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर, माझे घर–माझे अधिकार हे ब्रीद. ७० हजार कोटींची गुंतवणूक येणार, झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम (गृहनिर्माण विभाग) ४) सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजना, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे या प्रकल्पाच्या ५३२९.४६ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. ५२,७२० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार (जलसंपदा विभाग) ५) अरुणा मध्यम प्रकल्पांतर्गत मौजे हेत, तालुका वैभववाडी जिल्हा सिंधुदुर्ग या प्रकल्पासाठी २०२५.६४ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. ५३१० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार (जलसंपदा विभाग) ६) पोशिर प्रकल्प, तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला ६३९४.१३ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग) ७) शिलार तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला ४८६९.७२ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग)

cmyk

# खरीप हंगामात कोणतेही अधिकारी रजेवर जाणार नाहीत

## अन्यथा कारवाई, कृषीमंत्री कोकाटेंचा इशारा, अधिकाऱ्यांना फटकारले

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज खरीप हंगाम आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच फटकारले आहे. बैठकीला येताना अपूर्ण माहिती असणाऱ्या आणि गैरहजर असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोकाटे संतापल्याचे पाहायला मिळाले. गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश जेखील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले आहेत. त्याचबरोबर खरीप हंगामात कोणतेही अधिकारी रजेवर किंवा संपावर जाणार नाहीत, असा इशाराही माणिकराव कोकाटे यांनी दिला आहे.

मागेल त्याला शेततळे मग मागेल त्याला सोलर पंप का नाही? कृषीमंत्र्यांचा सवाल

लाभक्षेत्र विकास आणि महावितरण कंपनीचे अधिकारी गैरहजर असल्याने कोकाटे यांनी कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत. राज्यभरात होणाऱ्या खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीला त्या त्या भागातील प्रमुख अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याच्या सूचना अन्यथा मुख्यमंत्र्यांकडे कारवाई करण्यासाठी अहवाल पाठवण्याचा इशारा देण्यात आला आहे. महावितरण कंपनीचे जे



अधिकारी बैठकीला उपस्थित आहेत, त्यांना सोलर पंप बाबतीत अपूर्ण माहिती असल्यानं कोकाटे यांनी भर मिटींगमध्येच वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन लावून माहिती घेतली आहे. मागेल त्याला शेततळे मग मागेल त्याला सोलर पंप का नाही? असा सवाल कोकाटे यांनी बैठकीत उपस्थित केला.

संप पुकारुन शेतकरी आणि सरकारला कोणीही वेठीस धरणार नाही

दरम्यान, खरीप हंगामात कोणताही अधिकारी रजेवर किंवा संपावर जाणार नसल्याच्या सूचना माणिकराव कोकाटे यांनी दिल्या आहेत. संप पुकारुन शेतकरी आणि सरकारला कोणीही वेठीस धरणार नाही, अन्यथा प्रशासकीय कारवाई केली जाईल असा इशारा कोकाटे यांनी दिला आहे. दोन दिवसांनी मुख्यमंत्रीच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे. त्यावेळेस कृषी विभाग तयार असल्याचे आश्वासन मी त्यांना देणार असल्याचे माणिकराव कोकाटे म्हणाले.

दरम्यान, आज कृषीमंत्री मामिकराव कोकाटे यांनी खरीप हंगामाच्या संदर्भात नाशिकमध्ये आढावा बैठक घेतली. यावेळी या बैठकीला काही अधिकाऱ्यांना अनुपस्थिती दर्शवल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळं कृषीमंत्री कोकाटे यांनी चांगलाच संताप व्यक्त केला आहे. आजच्या या खरीप हंगामांच्या संदर्भातील बैठकीला गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश देखील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले आहेत. तसेच खरीपं हंगामात अधिकारी रजेवर गेल्यास कारवाई करणार असल्याचा इशाराहबी देण्यात आला आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८८१ : वॉशिंग्टन (डी. सी.) येथे अमेरिकन रेड क्रॉस ची स्थापना झाली.
१८८१ : युरोपीय देशांतील गृहयुद्ध संपल्यानंतर क्लारा बार्टन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून अमेरिकेतील वॉशिंग्टन डी.सी. मध्ये अमेरिकन रेड क्रॉसची स्थापना केली.
१९०४ : पॅरिसमध्ये फेड्रेशन इंटरनॅशनल डी फुटबॉल असोसिएशन (फिफा) ची स्थापना झाली.
१९२७ : चार्ल्स लिंडबर्ग यांनी एकट्याने जगातील पहिले न थांबता अटलांटिक महासागर पार करणारे उड्डाण पूर्ण केले.
१९३२ : अमेलिया इअरहार्ट ह्या अटलांटिक महासागर एकटयाने पार करणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या.
१९७० : अमेरिका राष्ट्राने देशांत आण्विक शास्त्राची चाचणी केली.
१९९१ : पंतप्रधान राजीव गांधी यांची श्रीपेरांबदुर येथे आत्मघातकी पथकाने हत्या केली.
१९९२ : चीनने १,००० किलो टन क्षमतेच्या अणुबॉम्बची यशस्वी चाचणी केली. हा जगातील सर्वात शक्तिशाली अणुस्फोट आहे.
१९९४ : ४३ व्या जागतिक सौंदर्य स्पर्धेत मिस इंडिया सुश्मिता सेनने मिस युनिव्हर्स हा किताब पटकावला. हा किताब मिळवणारी ती पहिलीच भारतीय आहे.
१९९६ : सांगली जिल्ह्यातील माधवराव पाटील हे ब्रिटन मधील इलिंग शहराचे महापौर झाले.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७१ : आल्ब्रेख्त ड्यूरर, जर्मन चित्रकार.
१५२७ : फिलिप दुसरा, स्पेनचा राजा.
१७९२ : गुस्ताव कोरियोलिस, फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ
१९१४ : जगातील सर्वात जास्त उंचीचे माउंट एव्हरेस्ट शिखर प्रथम चढून जाण्याचा मान मिळवणारे शेर्पा तेनसिंग यांचा नेपाळमधील थामी गावी जन्म..
१९१६ : अमेरिकन कादंबरीकार हेरॉल्ड रॉबिन्स यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑक्टोबर १९९७)
१९२१ : आंद्रेई सखारोव्ह, रशियन भौतिकशास्त्रज्ञ.
१९२२ : प्रसिद्ध अमेरिकन आंतरराष्ट्रीय व्यावसायिक कोर्टाचे न्यायाधीश जेम्स लोपेझ वॉटसन यांचा जन्मदिन.
१९२३ : स्विस गणितज्ञ अर्मांड बोरेल यांचा जन्म. (मृत्यू: ११ ऑगस्ट २००३)
१९२८ : कला समीक्षक व लेखक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर २०१०)
१९३० : माल्कम फ्रेझर, ऑस्ट्रेलियाचा २२वा पंतप्रधान.
१९३१ : हिन्दी कवी, लेखक व उपहासकार शरद जोशी यांचा जन्म. (मृत्यू: ५ सप्टेंबर १९९१)
१९४४ : मेरी रॉबिन्सन, आयर्लंडची राष्ट्राध्यक्ष.
१९५६ : अभिनेता रविन्द्र मंकणी यांचा जन्म.
१९५८ : भारतीय-अमेरिकन फॅशन डिझायनर नइम खान यांचा जन्म.
१९६० : दक्षिण भारतीय अभिनेता मोहनलाल यांचा जन्म.
१९७१ : प्रख्यात भारतीय चित्रपट निर्माता व पटकथा लेखक आदित्य चोपडा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४७१ : इंग्लंडचा राजा हेन्री (सहावा) यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १४२१)
१६८६ : वातावरणाबाबत मूलभूत सिद्धांत मांडणारे जर्मन पदार्थवैज्ञानिक ऑटो व्हॉन गॅरिक यांचे निधन. (जन्म: ३० नोव्हेंबर १६०२)
१९२९ : आर्चिबाल्ड प्रिमरोझ, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१९७३ : बाळकृष्ण ढवळे, मराठी मुद्रण व प्रकाशन क्षेत्रातील व्यवसायिक.
१९७९ : स्वातंत्र्य वीरांगना जानकीदेवी बजाज यांचे निधन. (जन्म: ७ जानेवारी १८९३)
१९९१ : भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या. (जन्म: २० ऑगस्ट १९४४)
१९९३ : ब्रिटीश सैन्य दलातील हवाई अधिकारी मेजर जनरल जॉन डटन ''जॉनी'' फ्रॉस्ट यांचे निधन.
१९९८ : इंटकचे सोलापुरातील नेते आबासाहेब बाबूराव किल्लेदार यांचे निधन.
२००० : हर्बालाइफ कंपनी चे स्थापक मार्क आर. ह्यूजेस यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १९५६)
२००२ : सुलतान अहमद, निर्माते दिग्दर्शक.
२००५ : बंगाल वंशीय सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट निर्माता व दिग्दर्शक सुबोध मुखर्जी यांचे निधन.

## तुर्कीच्या सफरचंद आयातीवर व्यापाऱ्यांचा बहिष्कार




मुंबई : सध्या जागतिक बाजारात सफरचंदावरून राजकारण तापलं आहे. देशभरातील व्यापाऱ्यांनी तुर्कीहून आयात होणाऱ्या सफरचंदावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे देशांतर्गत सफरचंदाला मागणी वाढेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. तसेच या निर्णयामुळे काश्मीर खोऱ्यातील सफरचंद उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होईल, असा दावा व्यापारी करत आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावाचे व्यापारावर पडसाद उमटू लागले आहेत. तुर्कीने पाकिस्तानाला लष्करी मदत दिल्यामुळे भारतात आयात होणाऱ्या तुर्की वस्तूंवर बहिष्कार घालण्याची मागणी केली जात आहे. हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुक्खू यांनी पंतप्रधान मोदींना पत्र लिहून तुर्कीच्या सफरचंद आयातीवर निर्बंध घालण्याची मागणी करणार असल्याचं सांगितलं आहे. या आयातीमुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसत असल्याचं सुक्खू यांचा दावा आहे. त्यामुळे सफरचंद आयातीला बंदी घालण्याच्या मागणीने जोर धरला आहे. या मागणीमुळे दिल्लीतील व्यापाऱ्यांनी तुर्कीशी व्यापार थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. २०२३२०२४ मध्ये भारताने तुर्कीहून ११.७६ लाख टन सफरचंद आयात केली. त्यामुळे देशांतर्गत उत्पादनास थेट स्पर्धा निर्माण झाल्याचं व्यापारी सांगतात. तुर्कीहून येणारी सफरचंदं अनेकदा स्वस्त दरात विकली जातात. त्यामुळे स्थानिक पातळीवर सफरचंदांच्या किमती खाली जातो, असा काश्मीरच्या शेतकऱ्यांचा आरोप आहे. व्यापाऱ्यांच्या या निर्णयाचं त्यामुळे शेतकऱ्यांकडून स्वागत केलं जात आहे. तुर्की आणि इराणसारख्या देशातील स्वस्तात सफरचंद आयात करण्याच्या निर्णयाला आमचा विरोध असल्याचं शेतकरी आणि व्यापारी सांगतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी या निर्णयाला पाठिंबा दिला आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये दरवर्षी २० लाख टनांहून अधिक सफरचंदांचं उत्पादन होतं. तर सुमारे ७ लाख कुटुंबं या उद्योगावर अवलंबून आहेत. त्यामुळे यापूर्वीही काश्मीरमधील सफरचंद उत्पादक शेतकरी अमेरिका, इराण, तुर्की आणि अफगणिस्तानवरून सफरचंद आयातीवर १०० टक्के आयात शुल्क लावण्याची मागणी केलेली आहे.

२०२३ मध्ये भारतानं सफरचंदावरील २० टक्के शुल्क हटवलं होतं. त्यामुळे सफरचंद उत्पादकांना फटका बसला. भारत अमेरिकन सफरचंदांवरील आयात शुल्क पूर्णपणे हटवण्याचा विचार करत असल्याची चर्चाही सध्या सुरू आहे. भारताने आयात शुल्क हटवलं तर उत्पादकांना मोठा फटका बसेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## 'महसूल विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मानवीय दृष्टीकोनाने अचूक कर्तव्य पार पाडावे' विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार

सांगली

महसूल विभाग हा शासनाचा कणा व चेहरा आहे. गावस्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत जे महसूल अधिकारी काम करतात, त्यांच्या कामामधून शासनाच्या ध्येय धोरणाचे, कार्यपध्दतीचे दर्शन लोकांना घडत असते. यामुळे शासनाच्या सेवेत आपल्यावर असणारी जबाबदारी अतिशय चोखपणे, अचूकपणे व मानवतावादी दृष्टीकोन ठेवून पार पाडणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.



महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पाच दिवसीय प्रशिक्षणाचा शुभारंभ पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीव्दारे झाला. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात हे प्रशिक्षण होत आहे. शुभारंभ सत्रात प्रत्यक्षरीत्या जिल्हाधिकारी अशोक काकडे, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अजय पवार, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) डॉ. स्नेहल कनिचे, प्रशिक्षक उपजिल्हाधिकारी डॉ.संजय कुंडेटकर, ॲड. प्रविण भांगे, तहसिलदार अमोल कुंभार आदि व्यासपीठावर उपस्थित होते. प्रशिक्षणामुळे आपली क्षमता वृध्दिंगत होते. अशा प्रकारची प्रशिक्षणे फक्त नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे तर इतरांनाही वर्षातून किमान एकदा रिफ्रेशर कोर्स म्हणून घेण्याच्या सूचना करून विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार म्हणाले, महसूल विभागाच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपली, जबाबदारी, कर्तव्य समजून घ्यावे, असे ते म्हणाले. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार म्हणाले, प्रशिक्षणार्थींनी जमीन महसूल संहिता व त्या अनुषंगाने असलेले सर्व नियम, फेरफार नोंदणी, डिजीटल स्वाक्षरी, लोकांना सेवा देण्याबाबतची कार्यपध्दती, जमीनविषयक अन्य कायद्यांची तोंडओळख प्रशिक्षणामध्ये करून द्यावी. तलाठ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील जमीन विषयक माहिती, भूसंपादन केलेल्या जमिनी, निर्बंध असलेल्या जमिनी यांची सविस्तर माहिती करून घ्यावी. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येकाच्या कामाचे प्रत्येक तीन महिन्याने मूल्यमापन करावे, असे त्यांनी सूचित केले. शासनाने व जनतेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवावा. कलम १५५ चा गैरवापर होणार नाही, सरकारी जमिनीचा गैरव्यवहार, निर्बंध असलेल्या जमिनीचे व्यवहार होणार नाहीत, कुठल्याची प्रकारची चुकीची नोंद घेतली जाणार नाही. तसेच ती पुढे पाठविली जाणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी. काही चुकीचे आढळल्यास तात्काळ वरिष्ठांच्या निदर्शनास आणून द्यावे, असे त्यांनी सूचित केले. तलाठ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांशी सुसंवाद ठेवावा. निवडणूक प्रक्रिया पार पाडतानाही ती अचूकपणे पार पाडावी. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीच्या आधारे आपले शासकीय कर्तव्य अचूक पार पाडावे. कोणतीही अडचण असल्यास ती कुटूंब प्रमुख म्हणून सोडविण्यासाठी कटिबध्द असल्याची ग्वाही डॉ. पुलकुंडवार यांनी यावेळी दिली.प्रास्ताविकात जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, प्रशिक्षण म्हणजे मानवी संसाधनातील गुंतवणूक आहे. प्रशिक्षणात दिलेल्या माहितीच्या नोटस्? काढाव्यात. नियम बारकाईने आत्मसात करावेत. प्रशिक्षणामुळे दृष्टी येते. कायद्यानुसार अचूकपणे काम पार पाडावे. अनावधानानेही चूक होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रत्येकाला राज्यगीत तसेच संविधानाचे प्रास्ताविक तोंडपाठ असले पाहिजे. प्रशिक्षणाच्या शेवटी परीक्षा घेऊन याबाबतचे मूल्यमापन केले जाईल व विजेत्यांना बक्षीस वितरण केले जाईल. जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, गतिमान प्रशासकीय अभियानांतर्गत महसूल अधिकारी, कर्मचारी यांचा प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेतला आहे. नेमणूकीपासून तीन वर्षांपेक्षा कमी कालावधी झालेल्या सांगली जिल्ह्यातील ९२ तलाठी व ४ लिपिक यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या तरतुदी, कूळकायद्याच्या विविध तरतुदी, सिलींगच्या विविध तरतूदी, संगणकीकृत सातबाऱ्याच्या विविध तरतुदी, सहा बंडल सिस्टीम, वर्कशीट आदीच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## लिंबूवर्गीय फळ पिकांमध्ये उंच वाफे लागवड प्रणाली

भारतातील एकूण फळपिक क्षेत्रापैकी सुमारे ४.८३ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये लिंबूवर्गीय पिकाची लागवड केली जात असून एकूण उत्पादन सुमारे ४२.८ लाख टन एवढे आहे. भारतातील एकूण नागपुरी संत्राचे १४७२४०१ टन उत्पादन असून १६५३७६ हेक्टर क्षेत्र आणि १०.० टन/ हेक्टर उत्पादकता आहे, जे ब्राझील, चीन, मेक्सिको आणि स्पेन सारख्या इतर विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी (३०-४० टन/ हेक्टर) आहे.

सर्व लिंबूवर्गीय उत्पादक राज्यांपैकी, महाराष्ट्र राज्यात लिंबूवर्गीय पिक क्षेत्र (१.६० लाख हेक्टर) व उत्पादन (६.२ लाख टन) या बाबतींत एक आघाडीचे राज्य आहे. भारतात लिंबूवर्गीय फळे म्हणजे संत्रा, मोसंबी आणि लिंबू त्यांच्या अंतर्गत एकूण क्षेत्रफळाच्या (३.४८ लाख हेक्टर) अनुक्रमे ५०, २० आणि १५ टक्के आहे. भारतातील लिंबूवर्गीय फळांच्या लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकी सुमारे ४२% क्षेत्र संत्रा पिकाने व्यापलेले आहे. मोसंबी (सायट्रस सायनेन्सिस) हे राज्यातील सर्वात प्रचलित लिंबूवर्गीय फळ असून ते महाराष्ट्राच्या विदर्भ भागात आणि मध्य प्रदेशच्या लगतच्या भागात मोठ्या प्रमाणावर घेतले जातात.

उंच वाफा :उंच वाफा ही एक आधुनिक लागवड पद्धत आहे ज्यामध्ये जमिनीच्या क्षेत्रफळानुसार १-२ मीटर रुंदीचे उंच वाफे तयार केले जातात. हि पद्धत कमी पाण्याच्या भागात फळझाडांच्या लागवडीसाठी वापरली जाते. मुसळधार पाउस असलेल्या भागातही या पद्धतीत झाडे उंच वाफ्यावर न कोसळता वाढू शकतात तसेच पाण्यासोबत खते वाहून जाणे, मूळकुज होणे इत्यादी नुकसान टाळले जातात. उंच वाफा पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे सरींमध्ये पाणी साचले जाते व त्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढते.

उंच वाफा लागवड पद्धतीची आवश्यकता : उंच वाफ्यावर फळझाडे वाढवण्याचे अनेक फायदे आहेत जसे की वसंत ऋतूमध्ये माती लवकर तापते, त्यामुळे लवकर लागवड करता येते, पाण्याचा सहज निचरा होऊ शकतो. लिंबूवर्गीय फळ झाडांची मुळे जमिनीत जास्त खोलवर जात नाहीत. त्यामुळे उंच वाफ्यातील पाणी, खते व पोषक द्रव्य यांचा झाडांच्या वाढीसाठी पुरेपूर उपयोग होतो. झाडांच्या वाढीसाठी मोकळी माती आवश्यक असते कारण मोकळ्या मातीमध्ये झाडाच्या मुळांना वाढण्यासाठी भरपूर जागा मिळते. पारंपारिक पद्धतीपेक्षा उंच वाफे पद्धत अधिक फायदेशीर ठरते. उंच वाफ्यांमुळे शिसे आणि इतर जड धातूंनी दूषित असलेल्या जमिनीवरही झाडांची सुरक्षितपणे वाढ होणे शक्य होते. या पद्धतीमुळे मातीची सुपीकता आणि गुणवत्ता सुधारते तसेच मातीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मात वाढ होते व क्षारतेची समस्या कमी होते. सुधारित पाणी व्यवस्थापन, उत्तम पाण्याचा निचरा व साठवण, कमी बाष्पीभवन तसेच वारा/पाणी यांची धूप कमी होते.भाजीपाल्याची आंतरपीके : उंच वाफ्यावर लिंबूवर्गीय फळझाडांच्या लागवडीला चाळ क्षेत्रात भाजीपाला आंतरपीक घेण्यास वाव आहे. आयसीएआर-सीसीआरआयच्या प्रयोगाने शेतकऱ्यांना नवा मार्ग दाखवला आहे. २०२० मध्ये टोमॅटो, वांगी भेंडी, कोबी आणि मुळा या भाज्यांचे उत्पादन घेण्यात आले. टोमॅटो, वांगी, भेंडी आणि झेंडूच्या फुलांनीही मर्यादित क्षेत्रात (५०३० चौ.मी.) एवढी उत्पादकता दाखवून चांगली कामगिरी केली आहे. वी.एन.आर. हर्ष आणि एन.एच.बी. १००१ या जातीच्या वांग्याच्या रोपांची लागवड जून २०२० मध्ये ९०६० सें.मी. अंतरावर (रो टू रो आणि प्लांट टू प्लांट) करण्यात आली आणि कापणी जुलै महिन्यात सप्टेंबर पर्यंत सुरू झाली (२०२०) आणि जवळपास, हंगामात ३५ (टन/ हेक्टर) उत्पन्न मोजले गेले. अभिलाष जातीच्या टोमॅटोच्या एकूण ३५० रोपांची जानेवारी महिन्यात (२०२०) ६० ४५ सें.मी. अंतरावर (रो टू रो आणि प्लांट टू प्लांट) अंदाजे लागवड करण्यात आली. २५ टन / हेक्टर उत्पादन मोजले गेले. २०२० मध्ये प्रति हेक्टर क्षेत्राच्या आधारावर सुमारे ४.२९ टन/हेक्टर भेंडी, २० टन/हेक्टर फुलकोबी, २५ टन/हेक्टर पानकोबी आणि १२ टन/हेक्टर मुळा उत्पादनाची गणना करण्यात आली.



# लोकशाही मार्गाने निदर्शने करणाऱ्या आंदोलनकर्त्यांना पोलिस प्रशासनाने उचलले

## अजित पवारांची टगेगिरी सहन करणार नाही :डॉ.गणेश ढवळे






बीड। प्रतिनिधी

मी एकेकाला सुतासारखं सरळ करीन अशा वल्गना करणा-या पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या बीड जिल्ह्यात टोळक्यांनी मारहाण करत व्हिडिओ प्रसारित करून दहशत निर्माण केली असुन कायदा व सुव्यवस्था बिघडली असुन ती राखण्यास पोलिस प्रशासन असमर्थ ठरत आहे.

पोलिस प्रशासनाचा धाक राहिलेला नाही आणि पालकमंत्री अजितदादा यांचे पोलिस खात्यावर नियंत्रण नाही नसल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यास असमर्थ, पवनचक्की कंपन्यांकडून महसूल व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने दडपशाही व खोटे खंडणीचे गुन्हे दाखल असताना शेतकऱ्यांना न्याय देण्यास असमर्थ उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य असुन तिजोरीच्या चाव्या हातात असताना बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासकीय मदत वेळेवर देण्यासाठी असमर्थ तसेच बीड शहरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी महावितरणचे थकीत ३३ कोटी रुपये वीजबिल नियोजन अथवा वित्त विभागातुन देण्यास असमर्थ तसेच बीड जिल्ह्यातील जलजीवन योजनेंतर्गत कामांसाठी २५० कोटी निधीची आवश्यकता असताना केवळ १४ कोटी रुपये मंजूर करून ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यास असमर्थ बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी बीडच्या पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, आसाराम माने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने निदर्शने करत असताना त्यांना पोलिस प्रशासनाने आंदोलन करत असताना पकडून पोलिसांच्या गाडीत टाकून शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये नेले आणि २ अडीच घंटे शिवाजीनगर पोलिस स्टेशनला बसवुन ठेऊन अजितदादा बीडमधून गेल्यानंतरच सोडून दिले.

आज दि.१९ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालय आणि शिवाजीनगर पोलिस स्टेशन यांना देऊन त्यांची आवक जावक घेतलेली आहे.

तशा दैनिकात बातम्या १७,१८ तारखेला प्रसिद्ध झाल्या आहेत. आंदोलनकर्ते यांनी आक्षेपार्ह घोषणाबाजी केली नाही तसेच काळे झेंडे दाखवले नाही , अजितदादांची गाडी अडवली नाही. केवळ ५ आंदोलनकर्ते लोकशाही मार्गाने आंदोलन करत होते. माझ्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात येणार होते परंतु शुक्रवार पासुन ४ दिवस मी डॉ.आनिल बारकुल यांच्या दवाखान्यात आयसीयु मध्ये अडमिट आहे. मला दररोज रक्त चढवावे लागत असल्याने चक्कर येऊ शकते म्हणून आंदोलनास जाण्यासाठी परवानगी दिली नाही म्हणून मी आंदोलनात सहभागी नव्हतो. परंतु लोकशाही मार्गाने आंदोलन करणारांची पोलिस प्रशासनाकडून मुस्कटदाबी आणि अजितदादांची टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे लिंबागणेकर यांनी दिली आहे.



# पाईपलाईन,गटारीचे काम पाटोद्यात कधी पूर्ण होणार

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा शहरात लांजेश्वर जिल्हा धाराशिव येथून पिण्यासाठी पाटोदा शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे अनेक दिवसापासून पाईपलाईन टाकण्याचे काम व भुयारी गटार सुधार योजनेसाठी रस्ते खोदले आहेत परंतु रस्त्याच्या कडेला खोदलेले माती टाकली आहे गेल्या दोन-तीन दिवसापासून पाऊस आल्याने ोदलेल्या मातीच्या ढिगार्यावर पावसाचे पाणी पडत असून रस्ता चिकलमय झाला आहे त्यामुळे नागरिकाचे या रस्त्यावर आगमन करणे कठीण झाले आहे पाटोदा शहराला नुकतीच पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे त्या योजनेचे काम पाटोदा नगरपंचायत कडून होत आहे फुकट पुरा क्रांतीनगर भागातील प्रभाग क्रमांक १५ १६ १७ या प्रभागात पाणीपुरवठ्याचे पाईपलाईन टाकून झाले आहे पाणीपुरवठ्याचे पाईप टाकून झाले आहे. तरीही काही प्रभागात पाईपलाईन साठी अंतर्गत रस्त्याच्या कडेला खोदकाम सुरू आहे खोदकाम करताना माती रस्त्यावर टाकली आहे खोदकाम झाल्याबरोबर पाईप टाकून नाली बुजवली तरी माती रस्त्यावरच आहे मातीमुळे त्रास सहन करावा लागत आहे सध्या रस्त्यात चिखलाचा झाल्याने नागरिकांना चिखलातून वाट काढावी लागत आहे गुत्तेदाराने काम लवकर पूर्ण करण्याची मागणी करण्यात नागरिकांनी केली आहे.पाईपलाईन अंथरण्याच्या नावाखाली प्रभाग क्रमांक १७ मधील पाणी टाकी परिसरात गेले दोन महिने पाणी नसल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

# मराठवाडा विभाग अध्यक्षपदी अक्षय भुंबे यांची निवड



अंबाजोगाई । प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) पक्षाच्या मराठवाडा विभाग अध्यक्षपदी अक्षय भुंबे यांची निवड करण्यात आली आहे. सदरील निवडीचे पत्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांनी भुंबे यांना मुंबई येथे दिले.

सोमवार, दिनांक १९ मे रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांनी मुंबई येथे पक्ष कार्यालयात मराठवाडा विभाग अध्यक्षपदी अक्षय भुंबे यांची निवड करून त्यांना नियुक्तीपत्र दिले. नियुक्तीपत्रात नमूद केले आहे की, अक्षय भुंबे हे आंबेडकरी चळवळीत अनेक वर्षे काम करीत असून त्यांनी दलित, शोषित, कामगार यांच्या प्रश्नांसाठी आंदोलने केली आहेत. त्यामुळे आंबेडकरी चळवळीचे काम करण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) पक्षाच्या वतीने आपली नियुक्ती करण्यात आली आहे. तरीही ही नियुक्ती तीन वर्षांसाठी असेल तसेच पक्षविरोधी कारवाया आणि पक्षविरोधी भूमिका कोठेही तसेच सोशल मीडियात मांडल्यास पक्षाचा कायदेशीर या वैयत्तिक भूमिकेशी काहीही संबंध राहणार नाही याची नोंद घ्यावी असे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांनी नमूद केले आहे. पक्षाच्या ध्येयधोरणानुसार काम कराल अशी आशा बाळगून भुंबे यांच्या पुढील सामाजिक, राजकीय वाटचालीस मनःपुर्वक सदिच्छा व्यक्त केल्या आहेत. अक्षय भुंबे हे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अभ्यासू व निष्ठावंत पाईक आहेत. सातत्यपूर्ण कार्य करणारे अक्षय भुंबे हे आंबेडकरी चळवळीचा मराठवाड्यातील एक आश्वासक चेहरा आहेत. मागील काही वर्षांपासून भुंबे यांचे सामाजिक बांधिलकीतून कार्य सुरू आहे. ते डिघोळ अंबा सेवा सहकारी संस्थेचे व्हाईस चेअरमन आहेत. आजपावेतो त्यांनी लोकलढा उभारून ३० भूमिहीन कुटुंबांना कसण्यासाठी जमीन मिळवून दिली. तसेच श्रमजिवी, मजूर व गरजूंना मोफत ई-श्रम कार्ड आणि कोविड लॉकडाऊन काळात गरजू कुटुंबांना अन्नधान्याचे कीट वाटप केले. शेतकऱ्यांना तात्काळ सरसकट पिक विमा मंजुर व्हावा., एपीएल योजनेंतर्गत शासनाने स्वस्त धान्य वाटप व्हावे., डाटा एंट्री सुरू व्हावी., गावनिहाय पर्जन्यमापक यंत्र बसवावे., प्रत्येक गावात जनावरांसाठी चारा छावण्या उभा कराव्यात., शेतकऱ्यांना अखंड वीज देण्यात यावी., डिघोळअंबा हे गाव पाटोदा कृषि मंडळातून वगळून लोखंडी सावरगाव कृषि मंडळात समाविष्ट करावे या प्रमुख मागण्यांसाठी तसेच समाजात ज्यांना गरज आहे, त्यांच्या मदतीला सदैव धावून जात भुंबे यांनी यापूर्वी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव आणि ऑल इंडिया पँथर सेनेचे मराठवाडा युवक अध्यक्ष म्हणून ही त्यांनी सातत्यपूर्ण आंदोलन केले आहे. त्यांच्या याच समाजाभिमुख कार्याची नोंद घेवून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांनी भुंबे यांची मराठवाडा विभाग अध्यक्षपदी निवड केली आहे. आपल्या निवडीनंतर आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अक्षय भुंबे यांनी सांगितले की, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात सर्वांना सोबत घेऊन पक्ष संघटनेला अधिक बळकट करण्याचे काम करण्यात येईल. निवडीबद्दल भुंबे यांनी नेतृत्वाचे आभार मानले आहेत. अक्षय भुंबे यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

# दहावीच्या गुणवंतांचा त्यांच्या गावी जाऊन केला सत्कार

## सुरुडी आश्रमशाळेचा नाविन्यपूर्ण उपक्रम

आष्टी। प्रतिनिधी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर अंतर्गत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सुरुडी ता. आष्टी येथील शाळेचा निकाल दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १०० टक्के लागला असून कु. पूनम गायकवाड या विद्यार्थिनीने छत्रपती संभाजीनगर प्रकल्पातील सर्व शासकीय आश्रमशाळेतून प्रथम क्रमांक पटकावला तसेच चि. सुरज चिभडे हा शाळेतून द्वितीय व कु. बाळूबाई डाखोरे हिने शाळेतून तृतीय क्रमांक मिळवला. यावर्षी प्रकल्पअधिकारी यांच्या प्रेरणेने व सुरूडी टीमच्या सहकार्याने मुख्याध्यापक सुधाकर राठोड यांनी अनोखा उपक्रम हाती घेतला. १० वी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या गावी जाऊन गावातील नागरिक व पालकांसमोर विद्यार्थ्यांचा मानसन्मान करण्याचे आयोजन करण्यात आले. हा अनोखा उपक्रम पाहून गावातील सर्व नागरिक अतिशय आनंदी झाले.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांची गावातून मिरवणूक



काढण्यात आली. त्यानंतर गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा स्वागत सत्कार करण्यात आला तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना शाळेतर्फे भेटवस्तू देण्यात आली. गावातील नागरिकांनी तसेच माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व या नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत कौतुक व्यक्त केले व सुरुडी आश्रमशाळेची १०० % निकालाची परंपरा अशीच चालू राहावी यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाबद्दल प्रकल्प कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्पाधिकारी मॅडम तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी, व शासकीय आश्रम शाळा सुरुडी येथीलमुख्याध्यापक सुधाकर राठोड, नीता मुंडे,संभाजी मुसळे,शिवाजी गांधले, संतोष मेहत्रे, विशाल दोरगे, कविता पानसरे, नवनाथ रेवणकर, प्रतीक्षा मेश्राम, सुरज शिंदे, प्रवीण पुंड, केतन काकडे, संगीता जाधव, अमित पवार, वैजनाथ आतकरे, चांगदेव पवार, प्रियंका नवले, निलेश आहेर, मदन सावंत, शाहुराव सानप, किसन शिंदे, वेणूबाई केसकर, मोहन जाधव, विलास जाधव, मच्छिंद्र शिरसाट, सुनिता खरात, बाबू हजारे, रेणुका खोकले, संदीप ढेपे, सर्व शिक्षक तथा कर्मचारी वृंद व पालकांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अकरावी प्रवेश मार्गदर्शन कक्षाची स्थापना

बीड। प्रतिनिधी

येथील महीला कला कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया संदर्भात मार्गदर्शन कक्षाची स्थापना करण्यात आली असून प्रवेशासाठी मोफत मार्गदर्शन करण्यात येत आहे. नुकताच दहावी बोर्ड चा निकाल जाहीर झाल्यानंतर या शैक्षणिक वर्षापासून केंद्रीय पद्धतीने प्रवेश देण्यात येणार आहेत त्याकरिता विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी काही अडचणी निर्माण झाल्यानंतर त्यांना महीला कला महाविद्यालय बीड येथे मोफत मार्गदर्शन करण्याची व्यवस्था महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आली आहे. अकरावी प्रवेशा साठी पालक आणि विद्यार्थ्यांनी महिला कला महाविद्यालय, राजीव गांधी मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह जवळ,बीड येथे संपर्क साधून आपला प्रवेश लवकर निश्चित करावा, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ संध्या आयस्कर यांनी केले आहे. तसेच काही अडचण असल्यास संपर्क करू शकता.

# माजलगाव आगारात आणखी पाच लालपरी लवकरच दाखल होणार - पापा सोळंके

माजलगाव। प्रतिनिधी

परिवहन महामंडळ आगारासाठी विशेष बाब म्हणून नवीन आणखीन पाच लालपरी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन परिवहन मंत्री ना.प्रताप सरनाईक यांनी शिवसेना शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांना दिले आहे.

यासंदर्भात परिवाहान मंत्री ना.प्रताप सरनाईक यांना दि १९ मे सोमवार रोजी मंत्रालयात भेटून सदरील निवेदनाद्वारे शिवसेना शहरप्रमुख पापा सोळंके यांनी विनंती केली की बीड जिल्ह्यातील परिवहन महामंडळाचे माजलगाव आगार हे महामंडळाला सर्वाधिक उत्पन्न देणारे आगार आहे. मात्र या आगारामध्ये असलेल्या सर्वच्या सर्व बसेस जीर्ण अवस्थेत आहेत अशा बसेस आगारातून बाहेर पडल्यावर रस्त्यात सतत नादुरुस्त पडतात त्यामुळे




अपघात दुर्घटना घडण्याची शक्यता आहे बसेसची अशी अवस्था असताना या आगारास मागील दहा ते बारा वर्षापासून नवीन बस देण्यात आलेल्या नाहीत माजलगाव हे सर्वाधिक उत्पन्न देणारे आगार असताना नवीन बसेस उपलब्ध नसल्याने लांब पल्ल्याच्या बसेस सोडल्या जात नाहीत.

तरी परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांच्या माध्यमातून मागील आठवड्यामध्ये माजलगाव आगारात पाच बसेस दाखल झाल्या असून येत्या आठवड्यामध्ये आणखीन पाच बसेस माजलगाव आगारास देऊ असे आश्वासन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शिवसेना शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांना दिले.

यावेळी सोबत युवासेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे उपस्थित होते.

# छावाच्या वतीने मराठा गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

बीड। प्रतिनिधी

छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त बुलंद छावा संघटनेच्या वतीने दहावी, बारावी मराठा गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न होणार आहे तरी दहावी, बारावी मराठा गुणवंत विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करावी.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी होणार आहे. यावर्षी वर्ष दहावे असून जयंती निमित्त व्याख्यान व मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष प्राविण्यसह मिळवलेल्या यशाबद्दल त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मान होणार आहे. इयत्ता दहावीच्या ज्या विद्यार्थ्यांना ९०% च्या पुढे गुण आहेत व इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना ८५% च्या पुढे गुण आहेत अशा विद्यार्थ्यांचा सन्मान होणार असून अशा विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी खालील दिलेल्या मोबाईल नंबर वर नाव नोंदणी करावी विठ्ठल बहीर , नारायण गवते , आजिनाथ आदमाने, जीवन धांडे या नंबर वर रविवार दि.२५ मे २०२५ पर्यंत नाव नोंदणी करावी. नोंदणी झाल्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीची तारीख कळवली जाईल व त्या दिवशी मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला जाईल तरी जास्तीत जास्त मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करावी असे आवाहन बुलंद छावा सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# तणावामुळे होणारा हृदयविकार टाळण्यासाठी वेळीच उपचार करण्याची गरज- डॉ.जगदीश टेकाळे

पाटोदा। प्रतिनिधी

सध्याच्या धकाधकीच्या, गळेकापू स्पर्धेच्या आणि असुरक्षिततेच्या काळात ताणतणावाला अनेक लोक बळी पडत आहेत. तणाव हा मानसिक आरोग्याबरोबर शारीरिक आरोग्यावरही तितकाच दुष्परिणाम करत आहे. हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, मधुमेह आणि उच्च कोलेस्ट्रॉलचे वाढते प्रमाण हा एक चिंतेचा विषय ठरला असून वेळीच उपचार यावर करण्याची आवश्यकता आहे. अशा समस्या टाळण्यासाठी काय करता येईल, याबाबत तज्ज्ञांनी माहिती दिली आहे.

हल्ली तरुणांना शिक्षण, नोकरी, सोशल मीडिया, आर्थिक अडचणी आणि वैयक्तिक अपेक्षांच्या ओझ्यामुळे उच्च पातळीच्या तणावाचा सामना करावा लागतोय. २० ते ३० वयोगटातील तरुणांना हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, रक्तातील साखरेची उच्च पातळी, मधुमेह आणि उच्च कोलेस्ट्रॉलसारख्या आजारांचे निदान होत आहे. तणाव हा एक सायलेंट किलर ठरतो आहे, जरी त्याची लक्षणे लगेच दिसून येत नसली तरी. त्यामुळे एखाद्याला जीवघेण्या धोक्याचा सामना करावा लागू शकतो. तणाव हे कॉर्टिसोलची पातळी वाढवते, जे एक तणाव संप्रेरक आहे व त्याचा समतोल बिघडल्यास ते रक्तदाब आणि साखरेची पातळी वाढवू शकतो तसेच पोटाभोवती चरबी साठवण्यास सुरुवात होते, ज्यामुळे लठ्ठपणाची समस्या उद्भवू शकते. जे हृदयरोग आणि मधुमेहासाठी जोखीम घटक ठरत आहेत. दुर्दैवाने तरुण वयोगटातील रुग्ण हे त्यांच्या आरोग्याकडे फारसे लक्ष देत नाहीत. तरुणांनी त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेणे आणि प्रतिबंधात्मक उपाय करणे ही काळाची गरज आहे. झोपेच्या कमतरतेमुळे तणाव वाढतो, रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते आणि लक्ष केंद्रित करण्यास अडचणी येतात. यासाठी एक वेळ निश्चित करून दररोज त्याच वेळी झोपायला जाण्याचा आणि उठण्याचा प्रयत्न करा, अगदी वीकेंडला सुद्धा त्याच वेळापत्रकाचे पालन करा. रात्री किमान ७ ते ८ तास शांत झोप घेणे आवश्यक आहे. विविध अभ्यासांनुसार, शारीरिक हालचाली, व्यायाम हे कॉर्टिसोलसारखे तणाव संप्रेरक कमी करण्यास मदत करतात आणि मेंदूतील तणाव कमी करणारे एंडोर्फिनसारखे संप्रेरकाचे प्रमाण वाढवतात. केवळ जिमला जाऊनच व्यायाम करावा असे काही नाही, तर चालणे, नृत्य करणे, सायकल चालवणे हे व्यायाम प्रकारदेखील जिमला जाण्याइतकेच प्रभावी ठरतील. जंक फूडचे सेवन टाळून आहारात फळे, भाज्या, तृणधान्य आणि कडधान्यांचे सेवन करा. शर्करायुक्त पदार्थ आणि तळलेले पदार्थ ताण हे तुमच्या शरीराकरिता अहितकारक ठरतात. त्यामुळे तुम्हाला योग्य पोषण न मिळाल्यास थकवा जाणवू शकतो. जंक फूड, प्रक्रिया केलेले पदार्ख, तेलकट आणि हवाबंद डब्यातील पदार्थांचे सेवन टाळण्याचा प्रयत्न करा. दिवसातून फक्त १० मिनिटे लांब श्वास घेणे किंवा श्वासोच्छवासाचा व्यायाम करणे हे तुमचे मन शांत करू शकते. योग आणि ध्यान हे आपल्या भावनांचे व्यवस्थापन करण्यास, लक्ष केंद्रित करण्यास आणि शरीराला आराम देण्यास मदत करतात. तणावमुक्त राहण्यासाठी बऱ्याचदा डिजिटल ब्रेक घेणे गरजेचे आहे. वाढत्या स्क्रिन टाईममुळे एखादी व्यक्ती चिंताग्रस्त होऊ शकते आणि झोपेच्या गुणवत्तेवर याचा परिणाम होऊ शकतो. डिजिटल डिटॉक्स हा पर्याय वापरून पाहा असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# उल्हास गिराम यांच्या कार्यपद्धतीवर प्रभावित होऊन असंख्य तरुणांचा शिवसेनेत प्रवेश



बीड। प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारून आज उल्हास गिराम यांच्या पक्ष कार्यास दोन महिने पुर्ण होत आहेत. त्यांची विचारसरणी, सामान्य लोकांच्या गरजाशी निगडित आंदोलने याला प्रभावित होऊन बीड शहरातील बार्शीनाका परिसरातील असंख्य तरुणांनी उल्हास गिराम यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

शिवसेना पक्षफुटी नंतर बीड जिल्ह्यातील शिवसैनिक बॅकफुट आला होता. जिल्हाप्रमुख म्हणून उल्हास गिराम यांनी जबाबदारीचे भान ठेऊन जुन्या-नव्या शिवसैनिकांची मोट बांधून सामान्य शिवसैनिकांत उत्साह निर्माण केला. सामान्य जनता ज्या छोट छोटया समस्यानी ग्रासली आहे, हे हेरून आंदोलने उभारली. उल्हास गिराम यांच्या याच कार्यपद्धतीला प्रभावित होऊन आज शेकडो तरुण पक्ष प्रवेशा संदर्भात विचारणा करत आहेत. याचाच एक भाग म्हणजे आज बीड शहरातील बार्शीनका परिसरातील युवक मच्छिंद्र काळे, दिपक अंकुशे, परशुराम काळे, कृष्णा काळे, अनिल अंकुशे, सोनु रोकडे, दुसरा दीपक अंकुशे, करण अंकुशे, गोरख अंकुशे, पप्पु लोंढे, गणेश रोकडे, लखन काळे, अमोल लोंढे, मच्छिंद्र अंकुशे सह असंख्य युवकांनी प्रवेश केला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ माहुवाले, सुशील पिंगळे, सतिशसिह परदेशीं, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर, विशाल तांबे सह शिवसैनिकांची उपस्थिती होती.

राज्य लोकतंत्र
बुधवार, दि.२१ मे २०२५


# एक दस्तमध्ये शेतकऱ्यांच्या फसवणुकीची शक्यता

## उपक्रम रद्द करण्याची मराठा महासंघाची निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**एक राज्य, एक दस्त योजनेत शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होण्याची शक्यता असल्याने जमीन विकसन, विक्री आणि जमीन खरेदी-विक्री दस्त नोंदणी या दोन बाबी वगळण्यात याव्यात, अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे. तसेच या संदर्भात अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत सोमवारी निवेदन दिले आहे. अशी माहिती मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी दिली आहे.**

मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी सोमवार, दिनांक १९ मे रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, राज्यातील एका ठिकाणचा दस्त अन्य कोणत्याही जिल्ह्यात नोंदविता येण्यासाठी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाचा एक राज्य,एक दस्त हा उपक्रम सध्या प्रायोगिक तत्त्वावर मुंबई शहर आणि उपनगर या दोन जिल्ह्यांत सुरू आहे. या उपक्रमामुळे कोणत्याही जिल्ह्यातील दस्त राज्यातील अन्य कोणत्याही जिल्ह्यात नोंदविता येणार आहे. ३० एप्रिल रोजी याबाबतची अधिसूचना जारी करण्यात आली होती. राज्यातील दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये नजीकच्या गावामधील दस्त नोंदणी होत असते. ग्रामीण भागात आवश्यकतेनुसार दुय्यम निबंधक कार्यालये आहेत. नोंदणी विभागाच्या रचनेनुसार अमरावती विभागात ६२, छत्रपती संभाजीनगर विभागात ३४, लातूर विभागात ५२, मुंबई विभागात २४, नागपूर विभागात ७१, नाशिक विभागात ७५, पुणे विभागात ११० आणि ठाणे विभागात ७६ अशी एकूण ५०४ दस्त नोंदणी



कार्यालये आहेत. एक राज्य,एक दस्त या उपक्रमामुळे शेतकऱ्यांची फसवणूक तसेच अनेक गैरप्रकार होण्याची अधिक शक्यता आहे. सध्या राज्यात १ कोटी महसुली दावे प्रलंबित आहेत. त्यात या उपक्रमामुळे ५० लाख दाव्यांची अधिक भर पडेल, असे मराठा महासंघाचे म्हणणे आहे. राज्यातील एका टोकाच्या जमिनीचा व्यवहार दुसऱ्या टोकाच्या दस्त नोंदणी कार्यालयात होणे जरी सुलभ होणार आहे. तरी यामुळे दस्त नोंदणीत फसवणूक झाल्यास गृह खात्याच्या नियमानुसार नोंद झालेल्या ठिकाणी तक्रार किंवा गुन्हा दाखल करावा लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यासाठी फरफट सहन करावी लागणार आहे. दस्त नोंदणीला बनावट व्यक्ती उभी करणे, मृत व्यक्ती जिवंत दाखविणे, डोंगरी भागातील प्रकल्पांलगतच्या जमिनी खरेदी करणे, कुटुंबात हिस्से निश्चित झालेले नसताना एका भावाने कुटुंबांतील व्यक्तीचे हिस्से विकणे, सामायिक मालकीच्या इमारतीत एकाच हिस्सेदाराचे लीज डीड करणे, रेरा नोंदणीकृत नसणारे बेकायदा बांधकामातील फ्लॅट्स व प्लॉट विक्री होणे, सात-बारावर इतर अधिकारात नांवे असताना दस्त नोंदणी होणे, देवस्थानच्या जमिनी गुरवांच्या नांवावर असताना त्यांची विक्री आणि दस्त नोंदणी, तसेच अयोग्य मूल्यांकन, सीमांकन, हिस्से नसताना वाटप करणे आदी व्यवहार होऊ शकतात. त्यामुळे हा उपक्रम रद्द करावा, अंमलात आणू नये अशी मागणी आहे. मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय राजेंद्र कोंढरे यांच्या आदेशान्वये देण्यात आलेल्या निवेदनावर मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, बीड जिल्हा प्रसिध्दीप्रमुख रणजित डांगे, हिंदूलाल आबा काकडे, प्रकाश बोरगावकर, नानासाहेब गायकवाड, प्रशांत अदनाक, बालाजी शेरेकर, नानासाहेब धुमाळ, दयानंद गुजर, ओमकार चव्हाण, सचिन राऊत, माऊली वैद्य यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, अप्पर मुख्य सचिव - महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क महाराष्ट्र, नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय भवन, पुणे यांना ई-मेल द्वारे पाठविण्यात आल्या आहेत.

## सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून युवा शेतकऱ्याची आत्महत्या

**माजलगाव । प्रतिनिधी**

**सततची नापीकी व वाढत्या कर्जाच्या डोंगराला कंटाळून ४५ वर्षीय युवकाने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना दि १९ मे सोमवार रोजी मोठेवाडी येथे घडली.नरहरी आत्माराम खेत्री असे मृतकाचे नाव आहे.**



माजलगांव तालुक्यातील मोठेवाडी येथील नरहरी आत्माराम खेत्री यानी दि १९ मे सोमवार रोजी सकाळी शेतातुन येतो असे घरातील लोकांना सांगून निघून गेले होते. बराच वेळ झाला तरी घरी न परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला असता एका शेतात जाऊन विष प्राशन करून बेशुद्ध अवस्थेत ते आढळले.

ते घरातील कर्ते होते.त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगी, एक मुलगा,वृद्ध आई,मोठा भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या अचानक जाण्याने घरातील कर्ताच गेल्याने हे शेतकरी कुटूंब अक्षरशः खचले आहे.मृतक नरहरी यांच्यावर बँकेचे,लोकांचे देणे असल्यानेच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे समजते.याप्रकरणी मृतकाचा भाऊ विष्णु आत्माराम खेत्री यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माजलगांव ग्रामीण पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास बीट जमादार बाळु सोनवने व पोकॉ. गोविंद बाबरे हे करीत आहेत.

## उन्हाळ्यात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शहरासह तालुक्यात ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाने १८ मे रविवार आणि दि.१९ मे सोमवार २० मे मंगळवार सलग तीन दिवस दुपारी थैमान घातले. अचानक पडलेल्या या पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले. दरम्यान, मुसळधार पावसामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित झाला होता.**





अंबाजोगाई शहरासह तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून उष्णतेची तीव्र लाट पसरली आहे. गेल्या आठवड्यात पारा ३९ अंशाच्या वर गेला होता. उन्हामुळे शहरातील नागरिक दुपारी घरीच राहणे पसंत करीत होते. परंतू दुपारी मोठ्या प्रमाणात गर्मी होत असल्याने पाऊस येणार असे वाटत होते आणि झालेही तसे. दुपारीच अवकाळी पावसाने शहरासह तालुक्यात हजेरी लावली. यामुळे काही काळ जनजीवन विस्कळीत झाले. विजांचा मोठ्ठा कडकडाट आणि मुसळधार पाऊस यामुळे काही काळ उकाड्यापासून सुटका मिळाली असली तरी परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याची माहिती समोर आली आहे.

## अंबाजोगाई शहर व तालुक्याच्या सर्वांगीण विकासपर मागण्यांचे राजकिशोर मोदी यांचे अजितदादांना निवेदन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**राज्याचे उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार हे अंबाजोगाई शहरात आले असतांना त्यांना अंबाजोगाई शहर व तालुक्यातील विविध विकासात्मक मागण्यांचे निवेदन अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सोमवार दि १९ रोजी सादर केले. निवेदनातील विविध मागण्या बाबत ना अजितदादानी अतिशय सकारात्मकपणे विचार करण्याचेआश्वासन दिले आहे.**

मोदी निवास येथे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे आले असतांना त्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की यापूर्वीही आपल्या सातत्यपूर्ण सहकार्यामुळेच अंबाजोगाईच्या विकासाला चालना मिळाली आहे. त्याचप्रमाणे या मागण्यांचा बाबतीत देखील सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची विनंती व अपेक्षा तमाम अंबाजोगाईकरांच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनात सादर करण्यात आलेल्या मागण्या ज्यामध्ये १)



कोकणस्थांची कुलदेवता आणि अंबाजोगाईची ग्रामदेवता शक्तीचे उपपीठ माता श्री योगेश्वरी देवस्थान, सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर, आद्यकवी मुकुंदराज समाधी परिसर यासह सर्वधर्मीय समाज बांधवांच्या प्रार्थना स्थळांच्या, ऐतिहासिक व पौराणिक वास्तूंचे, संस्कृतीचे जतन व संवर्धन होऊन अशा सर्व परिसराच्या सर्वांगिण विकास होण्यासाठी अंबाजोगाई शहराला तीर्थक्षेत्र व पर्यटनाचा ''अ'' दर्जा बहाल करावा. २) शेतकऱ्यांच्या शेतीमालाला चांगला भाव मिळावा, मजूरांना रोजगार उपलब्ध व्हावा तसेच सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शेतीवर आधारित प्रक्रिया उद्योगाला चालना मिळण्यासाठी एखादा प्रकल्प मंजूर करण्यात यावा.

३) मराठवाडा मुक्ती संग्रामाचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांना भारतरत्न देण्यासंदर्भात महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे त्यांच्या नांवाची शिफारस व पाठपुरावा करावा. ४) अंबाजोगाई शहर रेल्वेशी जोडले जावे अशी जनतेची जुनी व जिव्हाळ्याची मागणी आणि अपेक्षा आहे. तरी आपल्या माध्यमातून या प्रश्नी पुढाकार घेण्यात यावा अशी विनंती करण्यात आली आहे. ५) अंबाजोगाई जिल्हा व्हावा अशी येथील जनतेची जुनीच मागणी आहे. या मागणीबाबत महायुती सरकारने सकारात्मक प्रतिसाद द्यावा आणि लवकरात लवकर अंबाजोगाई जिल्हा जाहीर करावा ही विनंती या निवेदनाद्वारे राजकिशोर मोदी यांनी तमाम अंबाजोगाई वासीयांच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. आमच्या मागण्यांना आशिर्वाद रुपी पाठबळ देण्याची नम्र विनंती देखील निवेदनाद्वारे केली आहे.

## सावरकर जयंतीनिमित्त अमृतच्या लक्षित गटासाठी २२ मे रोजी जिल्हास्तरीय रांगोळी व निबंध स्पर्धा

**बीड । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त 'अमृत'च्या लक्षित गटातील युवक-युवतींसाठी भव्य जिल्हास्तरीय रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)' या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या वतीने आणि दीनदयाल शोध संस्थान या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत.

ही स्पर्धा गुरुवार, २२ मे २०२५ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० या वेळेत जनशिक्षण संस्था, पांगरी रोड, बीड येथे होणार आहे. या स्पर्धेत फक्त अमृतच्या लक्षित गटातील १२ ते ३० वर्षे वयोगटातील युवक-युवतींनाच सहभागी होता येणार आहे. ज्या समाजाला कोणतीही संस्था, महामंडळ किंवा शासकीय विभागाअंतर्गत योजनांचा लाभ मिळत नाही अशा खुल्या प्रवर्गातील जाती या अमृतच्या लक्षित गटात मोडतात.

स्पर्धेतील रांगोळी आणि निबंधासाठी दोन वयोगट निश्चित करण्यात आले आहेत. १२ ते २१ वर्षे वयोगटासाठी रांगोळीचा विषय 'मेक इन इंडिया' तर निबंधाचा विषय 'डॉ. आनंदी गोपाळ जोशी' असेल. त्याचप्रमाणे, २१ ते ३० वर्षे वयोगटासाठी रांगोळीचा विषय 'माझी वसुंधरा' तर निबंधाचा विषय 'भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे' ठेवण्यात आला आहे. रांगोळी स्पर्धकांनी आवश्यक साहित्य स्वतः आणायचे आहे.

प्रत्येक गटातून विजेत्यांना रोख पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात येणार असून, प्रथम क्रमांक ₹२,०००, द्वितीय क्रमांक ₹१,५०० आणि तृतीय क्रमांक ₹१,००० असे आकर्षक बक्षीस ठेवण्यात आले आहे. या उपक्रमामधून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा वारसा पुढे नेत, अमृतच्या लक्षित गटातील युवकांमध्ये सृजनशीलता, देशभक्ती आणि सामाजिक भान निर्माण करण्याचा उद्देश आहे. अधिक माहिती व नोंदणीसाठी सौ. सीमा मनूरकर, सौ. सुमेधा मनसबदार, दीनदयाल शोध संस्थानचे संचालक श्री. गंगाधर देशमुख, विशाल जोशी जिल्हा व्यवस्थापक, अमृत बीड, श्री. दिगंबर जोशी, श्री. सुमित धिरडे यांच्याशी संपर्क करावा.

## श्रावण बाळ व संजय गांधी योजनेंतर्गत निराधार लाभार्थ्यांना अनुदान द्या-मानवलोकची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**श्रावण बाळ व संजय गांधी योजनेतील लाभार्थ्यांना बँकेकडून अनुदान मिळत नाही, श्रावण बाळ आणि संजय गांधी योजनेंतर्गत हजारो निराधार लाभार्थ्यांना मागील काही महिन्यांपासून अनुदानाची रक्कम बँकेमार्फत मिळत नाही. यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.यासंदर्भात मानवलोकच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन तहसिलदार यांना देण्यात आले**

त्यात केवायसी व व्हेरिफिकेशन पूर्ण असूनही अनुदान नाही अनेक लाभार्थ्यांनी सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या असूनही त्यांच्या खात्यावर अनुदान जमा झालेले नाही.तहसील व बँक दरम्यान लाभार्थ्यांची हेलपाटे तहसील व बँक दोघेही एकमेकांकडे पाठवतात. वयोवृद्ध व आजारी लाभार्थ्यांना या



प्रक्रियेत खूप त्रास सहन करावा लागतो. तहसीलमध्ये केवळ दोन कर्मचारी असल्यामुळे दररोज मोठ्या संख्येने लाभार्थ्यांची गर्दी होते. कृपया तात्पुरते दहा कर्मचारी नियुक्त करावेत.सर्व राष्ट्रीयकृत बँकांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन,डीबीटी व केवायसी प्रक्रियेसाठी योग्य सूचना द्याव्यात. बँक ऑफ महाराष्ट्र खाते अडचणी अनेकांचे खाते ''बंद'' सांगून पोस्ट बँकेत खाते उघडण्यास सांगितले जाते. यावर उपाययोजना करावी.कार्यालयीन वेळेआधी काम सुरू करावे.सकाळी नऊ वाजल्यापासून व्हेरिफिकेशन सुरू करावे, जेणेकरून काम लवकर पूर्ण होईल. तहसील कार्यालय परिसरात पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी. अर्धांगवायू, दृष्टीदोष,आधार नसलेले किंवा अंगठ्याचे ठसे न उमटणारे लाभार्थी यांची नोंद घेऊन त्यांना प्रक्रिया वगळून अनुदान द्यावे.लाभार्थ्यांना आधार व माहिती द्यावी अनेक लाभार्थ्यांना वाटते की त्यांचे अनुदान बंद झाले आहे. त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांना योग्य माहिती व मानसिक आधार द्यावा. वरील सर्व मागण्यांचा गांभीर्याने विचार करून त्वरीत कार्यवाही करावी असे निवेदनात म्हटले आहे. मानवलोकच्या वतीने तहसिलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनावर मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया,श्याम सरवदे,श्रीमती संजना आपेट,श्रीमती सावित्री सागरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तहसिलदार विलास तरंगे यांनी मानवलोक कार्यालयात येऊन महिलांशी संवाद साधला व सर्व बाबींवर चर्चा केली यावेळी पत्रकार प्रशांत बर्दापूरकर,राहूल देशपांडे व इतर उपस्थित होते.

## मान्सूनपूर्व कर्मचाऱ्यांनी अलर्ट राहण्याचे आदेश



**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील सर्व यंत्रणा प्रमुखांची तालुका आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत मान्सूनपूर्व आढावा बैठक जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून दि२०मे रोजी अंबड तहसील कार्यालयामध्ये श्री विजय चव्हाण तहसीलदार तथा प्र. उपविभागीय अधिकारी यांनी सर्व कर्मचारी अधिकारी यांची बैठक घेण्यात आली सदर बैठकीच्या वेळी विविध विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या त्याचबरोबर आवश्यक असलेल्या साहित्यांची तपासणी करून साहित्य आवश्यकता असल्यास त्याची मागणी करण्याकरिता कळवण्यात आली. त्याचबरोबर सर्व यंत्रणा प्रमुख यांच्या कर्मचाऱ्यांची अद्यावत यादी त्याचबरोबर त्यांना अलर्ट राहण्याविषयी सूचना देण्यात आल्या.

## भाजपचे जेष्ठ नेते मुरलीधर पाटील चौधरी यांचे निधन



**अंबड । प्रतिनिधी**

भाजपचे एकनिष्ठ जेष्ठ नेते मुरलीधर पाटील चौधरी (वय ७२ वर्षे) यांचे दि.२० मे रोजी दुपारी ३ वा दुःखद निधन झाले त्यांच्यावर अंबड तालुक्यातील आपेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले असुन त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.स्व.चौधरी हे राजस्थानचे राज्यपाल महामहिम हरिभाऊ नाना बागडे यांचे निकटवर्तीय होते.भाजपच्या जडणघडणीत चौधरी यांची मोठी भूमिका असुन त्यांच्या निधनानंतर शोक व्यक्त केला जात आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# श्री छत्रपती कारखान्याच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्विवाद वर्चस्व कायम; निवडणूक एकतर्फी जिंकण्यात पवार यशस्वी

**बारामती । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीकडे संपूर्ण पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्राचे लक्ष लागलं होतं. अखेर पुन्हा एकदा या निवडणुकीत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एक हाती सत्ता राखत निर्विवाद वर्चस्व मिळवलं. उपमुख्यमंत्री अजित पवार राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे आणि राज्य साखर संघाचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांच्या नेतृत्वातील श्री जय भवानी माता पॅनेलचे २१ पैकी २१ उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. संघर्षमय झालेल्या या लढतीमध्ये श्री जय भवानी माता पॅनलने श्री छत्रपती बचाव पॅनलचा सुपडासाफ केला आहे.



गट क्रमांक एक लासुर्णेमधून श्री जय भवानी माता पॅनेलचे पृथ्वीराज जाचक यांना ११६९४ मते मिळाली आहेत. तर शरद जामदार १०५२९ मते मिळाली आहेत. तर श्री छत्रपती बचाव पॅनलचे संजय निंबाळकर यांना ४८५० तर प्रताप पवार यांना ४१९७ मते मिळाली आहेत. गट क्रमांक दोन सणसरमध्ये श्री जय भवानी माता पॅनेलचे रामचंद्र निंबाळकर यांना १०९२९ मते मिळाली. तर शिवाजी निंबाळकर यांना १०४३१ मते मिळाली. विरोधी संग्राम निंबाळकर यांना ५१६५ मते मिळाली. तर महादेव शिरसाट यांना ३९५७ मते मिळाली.

तर उद्धट गटामधून श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार पृथ्वीराज श्रीनिवास घोलप यांना ९६७२ मते मिळाली. तर गणपत सोपान कदम यांना ९२९७ मते मिळाली. तर या गटात मात्र घोलप यांना मोठा फटका बसला आहे. इंदापूर पंचायत समितीचे माजी सभापती करणसिंह घोलप हे श्री छत्रपती बचाव पॅनलमधून मैदानात होते. त्यांना ६९६१ मते मिळाली आहेत. तर भाजपचे नेते तानाजीराव थोरात यांना ४७२१ मते मिळाली आहेत.

यात सोबत अंथुर्णे गटामधून श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार प्रशांत दासा दराडे यांना ११९८० मते मिळाली आहेत. तर अजित नरुटे यांना ११ हजार ९० मते मिळाली आहेत. विरोधी पॅनलचे श्री छत्रपती बचावमधून मैदानात असलेले बाबासाहेब झगडे यांना ४९४० मते तर राजेंद्र पाटील यांना ४८६० मते मिळाली आहेत.


अनिल सिताराम काटे यांना ११७८९ मते

गट क्रमांक पाच सोनगावमधून श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार अनिल सिताराम काटे यांना ११ हजार ७८९ मते मिळाली आहेत. तर बाळासाहेब कोळेकर यांना ११७६८ मते मिळाले आहेत. तर संतोष मासाळ यांना १०,३०७ मते मिळाली आहेत. याच गटात विरोधी असलेले श्री छत्रपती बचाव पॅनलचे उमेदवार रवींद्र टकले यांना ५४८२ मते मिळाली आहेत. तर गुणवडी गटामध्ये श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार कैलास गावडे यांना ११८३२ मते मिळाली. तर निलेश टिळेकर यांना ११,५६३ मते आणि सतीश देवकाते यांना ११,२६१ मते मिळाले आहेत तर विरोधी असणारे नितीन काटे यांना ५४३४ मते मिळाले आहेत.

तानाजी शिंदे यांना मिळाली ११३५८ मते

इतर मागास प्रवर्गमधून उभे असलेले श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार तानाजी शिंदे यांना ११३५८ मते मिळाली तर विरोधी असलेले संदीप बनकर यांना ५१६६ मते मिळाली. भटक्या विमुक्त जाती जमाती मतदारसंघातून श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार योगेश पाटील यांना ११८४३ मते मिळाली. तर योगेश पाटील यांना पाठिंबा दिलेले उमेदवार तुकाराम काळे यांना ४१७२ मते मिळाली. अनुसूचित जाती जमातीमधून श्री जय भवानी माता पॅनलचे उमेदवार मंथन कांबळे यांना ११५११ मते मिळाली तर विरोधी असणारे बाळासाहेब कांबळे यांना ४९६१ मते पडली असून, ब वर्गातून अशोक संभाजी पाटील यांना २६० मध्ये तर त्यांना पाठिंबा दिलेले सत्यजित भाऊसाहेब सपकळ यांना १६ मध्ये मिळाली आहेत.

## पुण्यात २ तासांच्या पावसाने उडवली दाणादाण; हिंजवडी, कात्रज परिसरात पाणीच पाणी, दुचाकी गेल्या वाहून



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात मुसळधार पावसाने (ठरळप) दमदार हजेरी लावल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे. त्यामध्ये, कुठे होर्डिंग, कुठे झाड तर कुठे वीज पडल्याच्या घटना घडल्या आहेत. पुणे (झींपश) शहरातील अनेक मार्गावर पाणीच पाणी झाल्याचं पाहायला मिळालं. तर, काही भागांत पावसाच्या वाहत्या पाण्यात दुचाकी गाड्याही वाहून गेल्याचं दिसून आलं. रस्त्याच्या कडेला, दुकानाच्या बाहेर लावलेल्या दुचाकी पावसाच्या पाण्यासोबत वाहून जातानाचे व्हिडिओ आता व्हायरल झाले आहेत. त्यामुळे, मान्सनपूर्व पावसाने पुणेकरांची दाणादाण उडवल्याचे चित्र दिसून आलं. सोशल मीडियावरही या पावसाचे फोटो आणि व्हिडिओ पाहायला मिळत आहेत.

पुण्यातील कात्रज परिसरात झालेल्या पावसामुळे दुकानांमध्ये पाणी गेलं आहे, रस्त्यावर जोरदार पाणी वाहत होते. तर, हिंजवडी भागातही पावसाचे पाणी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात साचल्याचे दिसून आले. पुणे शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यावर जोरदार पाणी वाहत होते, या पाण्याच्या वेगाने गाड्या देखील वाहून जात होत्या. पुण्यातील स्मार्ट सीटी प्रकल्पाचा भाग असलेल्या बाणेर भागात काही वेळ झालेल्या पावसाने मोठ्या प्रमाणात पाणी साचले. बाणेरमधील बीटवाईज चौकात अनेक वाहनं पावसाच्या या पाण्यात अडकली होती.

## शिवसेना पदाधिकारी निलेश घारेंच्या कारवर गोळीबार; संशयित हल्लेखोर पोलिसांच्या ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी निलेश घारे यांच्या मोटारीवर सोमवारी (दि. १९ मे) रात्री वारजे भागातील गणपती माथा परिसरात पिस्तूलातून गोळीबार करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. सुदैवाने मोटारीत कोणी नसल्याने मोठी दुर्घटना टळली. याप्रकरणी एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याची चौकशी सुरू आहे.





निलेश राजेंद्र घारे (वय ३७, रा. स्वरा हाईट्स, न्यू अहिरेगाव, वारजे) यांनी वारजे पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, अज्ञात हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितले की, एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले असून, तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घारे हे शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी असून, त्यांचा हॉटेल व्यवसाय आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी जिवाला धोका असल्याचा तक्रार अर्ज पुणे ग्रामीण आणि वारजे पोलिसांना दिला होता. त्यांचा एका व्यक्तीशी वादही झाला होता. सोमवारी रात्री ११:३० वाजण्याच्या सुमारास घारे हे त्यांच्या गणपती माथा परिसरातील कार्यालयात थांबले होते. त्यांनी कार कार्यालयासमोर उभी केली होती. यावेळी दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोराने कारच्या मागील काचेवर गोळी झाडली. गोळीबाराचा आवाज ऐकून घारे कार्यालयातून बाहेर आले आणि त्यांनी तातडीने वारजे पोलिसांना माहिती दिली.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान केली आहेत. हल्ल्यामागील नेमके कारण आणि हल्लेखोरांचा हेतू याबाबत अधिक तपास सुरू आहे.

## गुन्हे शाखेच्या अपर पोलीस आयुक्तपदी पंकज देशमुख यांची नियुक्ती

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर पोलीस दलाच्या गुन्हे शाखेच्या अपर पोलीस आयुक्तपदी पंकज देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार ही नेमणूक करण्यात आली असून, देशमुख यापूर्वी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकपदी कार्यरत होते. नुकतीच राज्य शासनाच्या गृह विभागाने त्यांची पदोन्नतीसह पुणे शहरात बदली केली होती.



देशमुख यांच्यासह पुण्यात बदलून आलेल्या तीन अतिरिक्त आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी जाहीर केल्या आहेत. त्यानुसार, पंकज देशमुख यांच्याकडे गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्तपद, तर राजेश बनसोडे यांची अपर पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बनसोडे हे यापूर्वी बिनतारी संदेश विभागाचे पोलीस अधीक्षक म्हणून पुण्यात कार्यरत होते.

तसेच, नागपूर येथील अपर पोलीस आयुक्तपदावरून पुण्यात बदलून आलेले संजय बी. पाटील यांना अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) पदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. या नव्या नेमणुकींमुळे पुणे शहर पोलीस दलाच्या प्रशासकीय आणि गुन्हे नियंत्रण यंत्रणेला बळकटी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## दोन ठिकाणी होर्डिंग कोसळले; नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**पुणे । प्रतिनिधी**

मंगळवारी झालेल्या जोरदार पावसानंतर शहरात दोन ठिकाणी होर्डिंग पडण्याच्या घटना घडल्या. यात एक होर्डिंग धानोरी पोरवाल रस्त्यावर, तर दुसरे होर्डिंग वाघोली परिसरात पडले. सुदैवाने या दोन्ही घटनांमध्ये कोणीही जखमी झाले नाही. या घटनांनंतर नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनांनंतर पुण्यात होर्डिंगचा धोका कायम असल्याचे सिद्ध झाले आहे.



वाघोलीत होर्डिंग पडली, त्या वेळी पावसामुळे रस्त्यावर जास्त वाहतूक नव्हती. त्यामुळे मोठा धोका टळला, तरी या होर्डिंगखाली अनेक दुचाकी गाड्या अडकल्या होत्या. नागरिकांनी केलेल्या दाव्यानुसार घटनेच्या काही वेळ आधीपर्यंत नागरिक त्या होर्डिंगखाली उभे होते. मात्र, पावसामुळे नागरिक आडोसा घेण्यासाठी बाजूच्या दुकानात गेल्यानंतर लगेचच हे होर्डिंग खाली पडले. धानोरी- पोरवाल रस्त्यावरील होर्डिंग पडण्याच्या काही वेळआधी रस्त्यावर आणि पादचारी मार्गावर नेहमीप्रमाणे गर्दी होती, अशी माहिती नागरिकांनी दिली. घटनेची माहिती मिळताच पालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी जाऊन त्वरीत कारवाई केली आणि होर्डिंगचा सांगाडा उचलला. त्यानंतर बेकायदेशीर आणि धोकादायक होर्डिंगचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. गेल्या काही वर्षांत पुण्यासह महाराष्ट्रात घडलेल्या होर्डिंग पडण्याच्या घटनांमध्ये अनेक नागरिकांना त्यांचा जीव गमवावा लागला आहे. होर्डिंगला परवानगी देताना नियमांची होणारी पायमल्ली आणि देखभालीकडे होणारे दुर्लक्ष याबद्दल नागरिकांची चिंता वाढली आहे. शहरात अशा बेकायदेशीर आणि धोकादायक होर्डिंगची संख्या किती आहे आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी पालिकेला कधी जाग येणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

## कोरोनाचा पुन्हा शिरकाव..! मुंबईपाठोपाठ पुण्यातही आढळला पहिला रुग्ण; ८७ वर्षीय पुरुष रुग्णाला कोरोनाची लागण

**पुणे । प्रतिनिधी**

सिंगापूर आणि हाँगकाँगमध्ये पुन्हा एकदा कोरोनाने डोकं वर काढलं आहे. गेल्या काही दिवसांत येथील कोरोना रुग्णसंख्येत कमालीची वाढ झाली आहे. अशातच आता मुंबईसह महाराष्ट्रातही कोरोनाचे रुग्ण आढळून आले आहेत. महाराष्ट्रात सध्या कोरोनाचे ५७ रुग्ण सक्रिय असून यापैकी एक रुग्ण पुण्यात आढळला आहे. यामुळे आता मुंबईनंतर पुन्हा एकदा कोरोनाचा शिरकाव पुण्यात झाला आहे.

शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या ८७ वर्षीय पुरुषाला कोरोना विषाणूची लागण झाल्याचे समोर आलं आहे. यंदाच्या वर्षातील पुण्यातील हा पहिलाच रुग्ण असल्याने आरोग्य यंत्रणेत खळबळ उडाली आहे, असे असले तरी वैद्यकीय तज्ज्ञांचे मते घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे सांगण्यात येत आहे. कोरोना विषाणू सध्याच्या सौम्य स्वरुपाचा उपप्रकार असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे. तसेच महाराष्ट्राबरोबरच तामिळनाडू आणि केरळमध्येही कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

राज्य मंत्रिमंडळाची सकाळी ११.३० वाजता मंत्रालयात बैठक होणार आहे. या बैठकीत पुण्यात कोरोनाचा रुग्ण आढळल्याने याविषयी चर्चा होऊन निर्णय घेण्याची शक्यता आहे. याशिवाय या बैठकीत राज्यात सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाचे झालेले नुकसान आणि त्यांना मदत करण्यासंदर्भातही निर्णय होण्याची शक्यता आहे.

आरोग्य विभागाकडून चाचण्या

सोमवारी आरोग्य विभागाकडून ४६ चाचण्या करण्यात आल्या. त्यापैकी आरटीपीसीआर चाचण्यांची संख्या १५ होती, तर रॅपिड चाचण्यांची संख्या ३१ होती. २०२४ मध्ये ४ लाख ८४ हजार कोरोना तपासण्या करण्यात आल्या होत्या. त्यापैकी ५ हजार ५२८ रुग्णांचे अहवाल कोरोना पॉझिटिव्ह आले, त्यापैकी ३५ रुग्णांचा मृत्यू झाल्याची नोंद केली आहे. मात्र, यावर्षी जानेवारी ते मे या महिन्यात कोरोनाने एकाही मृत्यूची नोंद झालेली नाही.

## कोंढव्यातील डीपी रस्त्याच्या रखडलेल्या कामासाठी साखळी उपोषण

**कोंढवा । प्रतिनिधी**

कोंढव्यातील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून प्रस्तावित शिवनेरीनगर डीपी रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडले आहे. या कामाला गती मिळावी यासाठी माजी नगरसेवक ड. हाजी गफूर पठाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) कार्यकर्त्यांसह नरवीर तानाजी मालुसरे चौकात ज्योती हॉटेलजवळ बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे. पुणे मनपा प्रशासन डीपी रस्त्याच्या कामाला सुरुवात करेपर्यंत हे आंदोलन सुरू राहील, अशी माहिती त्यांनी दिली.



यावेळी बोलताना ड. पठाण म्हणाले, २००२ मध्ये ज्योती हॉटेल ते कुमार पृथ्वीपर्यंत डीपी रस्ता मंजूर झाला होता. मात्र, २३ वर्षांनंतरही हे काम पूर्ण झालेले नाही, हे मनपा प्रशासनाचे अपयश आहे. यामुळे गल्लीबोळात स्वच्छता वाहने जाऊ शकत नाहीत, ड्रेनेज लाईन टाकता येत नाही. परिणामी, घाणीचे साम्राज्य निर्माण होऊन कोंढवावासीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे. झोपी गेलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी हे साखळी उपोषण सुरू केले आहे.

या आंदोलनात आमदार चेतन तुपे, मनसेचे पुणे शहरप्रमुख साईनाथ बाबर, राष्ट्रवादीचे स्वीकृत नगरसेवक संजय लोणकर, माजी नगरसेविका हाजी परवीन फिरोज, माजी नगरसेवक रईस सुंडके, आपच्या नेत्या रुबीना काझमी, ऑल कोंढवा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष हाजी फिरोज, नारायण लोणकर, इम्तियाज शेख, उबेद शाह, जावेद सय्यद, समीर बागवान, शाहिद राजा, मजहर काश्मिरी, जावेद पठाण, सलमान शेख यांच्यासह सर्वपक्षीय नेते आणि राष्ट्रवादी कार्यकर्ते सहभागी झाले. त्यांनी मनपा प्रशासनाचा निषेध करत घोषणाबाजी केली. कोंढवा पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

डीपी रस्त्याचे काम लवकरच मार्गी लागणार शिवनेरीनगर डीपी रस्त्याचे काम सध्या कुमार पृथ्वीकडून सुरू आहे. मात्र, काही घरांमुळे कामात अडथळा येत आहे. या नागरिकांचे पुनर्वसन करून जागा ताब्यात घेण्यासाठी मनपाच्या भूमी व जिंदगी विभागाकडे पथविभागाचा पाठपुरावा सुरू आहे. जागा ताब्यात मिळाल्यास एका महिन्यात काम मार्गी लागेल, अशी माहिती पथविभागाचे उपअभियंता आदिल तडवे यांनी दिली.

## कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार; एक जखमी

**कुरकुंभ । प्रतिनिधी**

कुरकुंभ (ता. दौंड) हद्दीतून भरधाव वेगात जाणाऱ्या एका कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील एकाच मृत्यू झाला असून एकजण जखमी झाला आहे. सोमवारी (दि.१९) सांयकाळी ५ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.

राजेंद्र मेरगळ (वय ३०) असे मृत्युमुखी पडलेल्याचे नाव आहे. तर चंद्रकांत जाधव (वय ४० रा. मळद ता. दौंड) हे जखमी झाले आहेत. याबाबत भाऊसाहेब मेरगळ (वय २८) यांनी फिर्याद दिली आहे.



कारच्या चालकावर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार पुणे-सोलापुर राष्ट्रीय महामार्गावरील कुरकुंभ गावच्या हद्दीतील गिरमेवस्ती येथून राजेंद्र मेरगळ आणि चंद्रकांत जाधव दुचाकीवरून जात होते. यादरम्यान भरधाव वेगातील कारने दुचाकीला जबर धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला. अपघातात राजेंद्र मेरगळ यांना डोक्यास, हातापायास, किरकोळ व गंभीर दुखापती होऊन मृत्यु झाला. तसेच चंद्रकांत जाधव यांच्या हाताला, पायाला व बरगडीस किरकोळ व गंभीर दुखापत झाली आहे.

## तुटलेली केबल बाईकस्वाराच्या मानेला घासली, दैव बलवत्तर म्हणून जीव वाचला, पुण्यातील गंभीर घटना, सामान्यांच्या जीवाशी खेळ

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात अचानक तुटलेली केबल दुचाकी स्वाराच्या मानेला घासून अपघात झाल्याची घटना घडली आहे. या घटनेने सामान्यांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याची संतप्त भावना नागरिक व्यक्त करत आहेत. नांदेड सिटीकडून पुणे शहरात येताना अचानक तुटलेली केबल दुचाकी स्वाराच्या मानेला घासून अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. या दुचाकी स्वराच्या गळ्याला गंभीर जखम झाली आहे. ही केबल कोणाची होती आणि ती तिथे कशी आली याचं उत्तर नसल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. या बेकायदा केबल शहरातील सर्वच रस्त्यावर असलेले दुचाकी स्वारांसाठी पतंगाच्या मांज्यासारखा धोकादायक झाले आहेत. विश्व परदेशी असे जखमी झालेल्या दुचाकी स्वराचे नाव आहे, या अपघातानंतर दुचाकीस्वार परदेशी यांनी महापालिकेच्या पोर्टलवर ऑनलाईन तक्रार नोंदवली आहे.




केबल पतंगाच्या मांज्यासारखा धोकादायक असल्याचं चित्र

मिळालेल्या माहितीनुसार विश्व परदेशी हे नांदेड सिटीकडून शहरात दुचाकीवरून येत असताना अचानक तुटलेली केबल त्यांच्या मानेला घासली. यामध्ये परदेशी यांच्या गळ्याला गंभीर जखम झाली आहे. ही केबल कोणाची आणि ती तेथे कशी आली, याचे उत्तर नसल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहेत. दरम्यान, या बेकायदा केबल शहरातील सर्वच रस्त्यांवर असल्याने दुचाकीस्वारांसाठी पतंगाच्या मांज्यासारखा धोकादायक असल्याचं चित्र आहे. शहरभरात जागोजागी अशा केबल टाकल्याचं दिसून येतं. या केबलमुळे आणि घडलेल्या या गंभीर घटनेमुळे सामान्यांच्या जीवाशी खेळ होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

महापालिकेच्या पोर्टलवर ऑनलाइन तक्रार नोंदवली

विश्व परदेशी असे जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. या अपघातानंतर दुचाकीस्वार परदेशी यांनी महापालिकेच्या पोर्टलवर ऑनलाइन तक्रार नोंदवली आहे. त्यानंतर एका महिला अधिकाऱ्यांने त्यांना संपर्क साधला. महापालिकेने 'त्या भागात आमचे काम सुरू नाही,' असे सांगून या प्रकरणापासून हात झटकले. सोमवारी महापालिका अधिकारी आणि जखमी दुचाकीस्वार यांनी घटनास्थळी पुन्हा पाहणी केली. त्यानंतरही यात महापालिकेचा काही संबंध नसल्याचे सांगण्यात आले आहे. 'रस्त्यावर उघडपणे केबलचे टाकणाऱ्यांवर अंकुश ठेवण्याची जबाबदारी कोणाची आहे,' असा प्रश्न परदेशी यांनी उपस्थित केला आहे.

विश्व परदेशी घटनेबाबत काय म्हणाले?

विश्व परदेशी स्वारगेटकडे जात होते. या घटनेनंतर, परदेशी यांनी पुणे महानगरपालिकेकडे (पीएमसी) ऑनलाइन तक्रार दाखल केली. शनिवारी संध्याकाळी नागरी अधिकाऱ्यांनी परिसराची पाहणी केली आणि परदेशी यांना कळवले की केबल्स पीएमसीचे नाहीत; त्या एका खाजगी वाय-फाय सेवा देणाऱ्या कंपन्यांनी बसवल्या आहेत अशी माहिती दिली. विश्व परदेशी यांनी घटनेबाबत माहिती देताना सांगितलं की, शनिवारी सकाळी माझ्या कामासाठी बाहेर पडलो. काम पूर्ण केल्यानंतर, मी माझ्या स्कूटरवरून घरी परतत होतो. आनंदनगरमधील नव्याने बांधलेल्या उड्डाणपुलाखालून एक केबल लटकत होती. मी ट्रॅफिकमध्ये गाडी चालवत असताना, मला लटकणारा वायर लक्षात आली नाही. ती माझ्या मानेवर अडकली, आणि घासली गेली, ज्यामुळे मला गंभीर दुखापत झाली, कोणी अशी केबल कशी ठेवू शकते, असा प्रश्न त्यांनी पुढे केला आहे.

## शिवसेनेने रवींद्र धंगेकरांवर सोपवली मोठी जबाबदारी; महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी काँग्रेसला रामराम ठोकत रवींद्र धंगेकर यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यांच्या शिवसेनेतील प्रवेशाची त्यावेळी राज्यात मोठी चर्चा झाली होती. दरम्यान धंगेकर यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली जाणार असल्याच्या चर्चा होत्या. अखेर या चर्चा खऱ्या ठरल्या असून धंगेकर यांनी एकनाथ शिंदे यांच्या विश्वासातील नेते म्हणून ओळख निर्माण केली असून त्यांची पुणे महानगर प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.



महानगर प्रमुख पदाच्या अंतर्गत दोन ते तीन शहरं असतात. संपूर्ण पुणे शहरातील संघटनात्मक बांधणी, प्रचार, निवडणूक तयारी करून घेणे आणि स्थानिक पातळीवरील नेतृत्व घडवण्याची जबाबदारी या पदावरील व्यक्तीकडे असते. कसबा पेठ विधानसभा पोटनिवडणुकीत धंगेकर काँग्रेसकडून भाजपचा बालेकिल्ला फोडणारे एकमेव नेते ठरले होते. त्यांच्या या विजयामुळेच त्यांना शिंदे गटाकडून महत्त्वाची जबाबदारी मिळणार अशी चर्चा होती.

धंगेकर यांच्या नियुक्तीमुळे शिंदे गट पुण्यात आपली ताकद वाढवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं पहायला मिळत आहे. धंगेकर यांच्या अनुभवाचा फायदा आगामी महापालिका आणि इतर स्थानिक निवडणुकांमध्ये पक्षाला होणार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शहर संघटना नव्याने सज्ज होणार असून, पक्षाला पुन्हा एकदा पुण्यात मजबूत स्थान मिळवून देण्यासाठी ही योजना आखली गेली आहे. राजकीयदृष्ट्या ही नियुक्ती धंगेकर यांच्या कारकिर्दीतला महत्त्वाचा टप्पा असून, येत्या काळात त्यांच्या कार्यपद्धतीकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलं असणार आहे.